- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, १२ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७३ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

# ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा 'मारबत'



## वाणिज्य राजदूत व अभिनेतांच्या हजेरीने ऐतिहासिक मारबत महोत्सवाला जागतिक ओळख

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर शहराची अतिशय जुनी, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा असणारा 'मारबत महोत्सवाला यावर्षी प्रथमच बॉलीवुडमधील कलावंत व विविध देशातील वाणिज्य राजदूतांनी हजेरी लावल्याने जागतिक स्तरावर ओळख प्राप्त झाली आहे. तऱ्हाने तेली समाजतर्फे आयोजित पिवळी मारबत व काली मारबत उत्सव समितीच्या वतीने आयोजित काळी मारबत आणि विविध बडग्या आयोजन समितीतर्फे आयोजित बडग्या या नागपूरच्या लोक परंपरेतील या महोत्सवाचा ढोल-ताशांच्या गजरात आनंद व आस्वाद या पाहुण्यांनी घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, आमदार कृष्णा खोपडे, आमदार मोहन मते, आमदार राजीव पोतदार, महापौर निता ठाकरे, फ्रांसचे वाणिज्यदूत पॅट्रीक लेवेरीनो, नॉर्वेच्या वाणिज्य दूत मोनिका निगलगार्ड, फिनलँडच्या वाणिज्यदूत पेट्रा थीमन, प्रसिद्ध अभिनेता जॅकी श्रॉफ, सुप्रसिद्ध दिग्दर्शक सुभाष घई, प्रसिद्ध क्रिकेटपटू उमेश यादव, अभिनेता अंकुश चौधरी, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील आयुक्त डॉ. विपीन, ज्येष्ठ नगरसेविका आभा पांडे, क्रीडा समितीच्या सभापती दर्शना धवड, माजी महापौर दयाशंकर तिवारी, माजी महापौर अर्चना डेहनकर यांच्यासह साम टीव्हीचे संपादक निलेश खरे, एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक, प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर, ग्राफीक डिझायनर विवेक रानडे यांनी या महोत्सवाला हजेरी लावली.

मुख्यमंत्री, महापौर यांच्यासह फ्रांस, नॉर्वे, व फिनलँड देशाचे वाणिज्य राजदूतांनी पिवळी मारबतच्या मिरवणुकीवर पुष्प वर्षाव केला. यावेळी चितार ओळी चौकात जमलेल्या हजारो संख्येच्या नागरिकांनी जल्लोष करून इडा पिडा घेऊन जा गे... मारबत... या घोषणेचा गजर केला.

### पाहुण्यांकडून स्वागत

नागपूरची ही परंपरा विशेष असून मारबत महोत्सवाला १४५ वर्षांचा वैभवशाली इतिहास आहे. नागपूर शहराची ही परंपरा व संस्कृतीला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी नागपूर मनपाने पुढाकार घेऊन यावर्षी प्रथम मारबत महोत्सवाचे यशस्वी आयोजन केले. ही एक एकमेवाद्वितीय संकल्पना साकारल्याबद्दल तसेच दीडशे वर्षांपासून सातत्याने नागपूरकरांनी या परंपरेचे जतन केल्याबद्दल पाहुण्यांनी विशेष आभार मानले. ही लोक परंपरा कायम राखण्यासाठी तसेच महोत्सवाला जागतिक स्वरुप देण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या संकल्पनेचे सर्वांनी कौतुक केले.

### नागपूरच्या परंपरेला जागतिक ओळख देण्याचा उपक्रम : मुख्यमंत्री

या महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूरच्या या परंपरेला जागतिक स्वरुप देण्याचा हा प्रयत्न निश्चितपणे स्तुत्य आहे. महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून तसेच उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे व सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, क्रीडा सभापती दर्शना धवड यांच्या मार्गदर्शनात मारबत महोत्सवाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल मनपाचे अभिनंदन केले.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मरबत उत्सवाला १४५ वर्षांची ऐतिहासिक परंपरा असल्याचे सांगितले. मारबतीच्या जुन्या परंपरेला सांस्कृतिक पर्यटनाचे स्वरूप देऊन जागतिक स्तरावर लोकांना ही परंपरा समजावी, अनुभवता यावी या दृष्टीने नागपूर महानगरपालिकेने चांगली प्रसिद्धी केली आहे. त्यांनी मारबतीच्या उत्सवाला जागतिक महोत्सव करण्याचा महानगरपालिकेने जो प्रयत्न केला त्यासाठी महानगरपालिकेचे अभिनंदन केले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील सामान्य माणसांच्या जीवनात असणाऱ्या सर्व पिडा, प्रामुख्याने दुष्काळाच्या पिडेला घेऊन जावे अशी इच्छा व्यक्त केली. मुख्यमंत्री यांनी बडग्या व मारबतच्या आयोजकांचा उत्साह वाढविला.

पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारी या काळी मारबत, पिवळी मारबत व बडग्या या नागपूरच्या लोक संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. समाजातील घातक व दुष्ट प्रवृत्तींना आळा बसून सज्जन शक्तींना बळ मिळावे, या उद्देशाने ही लोक परंपरा दरवर्षी मोठ्या थाट्यात साजरी केली जाते. काळी व पिवळी संगम झाल्यानंतर दोन्ही मारबतीचे लोक एकमेकांना आलिंगन देत शुभेच्छा देतात.

### विदेशी पाहुण्यांनी घेतला आस्वाद

मारबत महोत्सवासाठी फ्रांस, नॉर्वे व फिनलँडच्या वाणिज्य दूतांनी या महोत्सवाला हजेरी लावली होती. या तिन्ही वाणिज्य दूतांनी नेहरू पुतळा येथून निघणाऱ्या काळी मारबतीच्या मिरवणुकीचे निरीक्षण केले. यावेळी त्यांनी या मिरवणुकीचा पुरेपूर आस्वाद घेतला. अनेकांनी छायाचित्रे काढून तसेच मोबाईलमध्ये क्षण चित्रबद्ध केले. याच ठिकाणी काळी मारबत व जागनाथ बुधवारी येथून निघाणारी पिवळी मारबतीचे मिलन होते. तेथून या दोन्ही मारबतीच्या मिरवणुकी शहरातील विविध भागातून मार्गक्रमण करीत तलावात विसर्जन केली जाते. या मिरवणुकीसोबत मस्कासाथ येथून निघणाऱ्या बडग्याचे सुद्धा या मिरवणुकीत निघते. शहरातील विविध भागातून वेगवेगळ्या संकल्पना घेऊन मारबत काढली जाते.

### फेल्ड मार्शलचा बडग्या

यावर्षी बडग्याची संकल्पना पाकिस्तानचे फिल्ड मार्शल आसिम मुनीर यांच्यावर आधारित होती. भारतासोबत नेहमीच युद्धाची भाषा करणाऱ्या फिल्ड मार्शल आसिम मुनीर यांच्या फेल्ड (अयशस्वी) मार्शल असे वर्णन करून बडग्या काढण्यात आला होता.

### जॅकी श्रॉफने 'बीडू...!' म्हणताच उपस्थितांमध्ये संचारला उत्साह

सुप्रसिद्धसिने अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी आपल्या चितपरिचित अंदाजात 'बीडू' उच्चारताच उपस्थितांमध्ये एकच उत्साह संचारला, त्यांनी 'ईडा पिडा घेऊन जा गे....!' चा घोष देत उपस्थितांनी प्रतिसाद देत 'मारबत' असा घोष दिला. परिणामी संपूर्ण वातावरण जल्लोषमय झाले. याशिवाय त्यांनी नृत्य करीत उपस्थितांच्या विनंतीला मान दिला. प्रसिद्ध अभिनेता जॅकी श्रॉफ यांनी इडा पिडा घेऊन जा गे मारबत अशा घोषणा देऊन मिरवणुकीतील नागरिकांची मने जिंकली. यावेळी अनेकांनी जॅकी श्रॉफ सोबत सेल्फी काढून घेतली.

प्रारंभी महापौर निता ठाकरे यांनी मुख्यमेत्री देवेंद्र फडणवीस यांचे मारबत महोत्वसाचा मोमेंटो, मानाचा दुपट्टा देऊन स्वागत केले. त्याचप्रमाणे यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सर्व वाणिज्य राजदूत, अभिनेता जॅकी श्रॉफ, सुभाष घई, क्रिकेटपटू उमेश यादव यांचे ही स्वागत करण्यात आले. या प्रसंगी पत्रकारांशी चर्चा करताना सर्व पाहुण्यांनी आयोजनाबद्दल मनपा व इतर आयोजकांची प्रशंसा केली. स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन केले. मनपाने आयोजित केलेल्या पहिल्या मारबत महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### पाहुण्यांचे विमानतळावर आदरपूर्वक स्वागत

नागपूरच्या पारंपरिक व सांस्कृतिक वारसा असलेल्या मारबत महोत्सवाच्या अनुषंगाने फ्रान्सचे वाणिज्य राजदूत पॅट्रीक लेवेरनो, नॉर्वेच्या वाणिज्य राजदूत मा. मोनीका नागलेगार्ड, फिनलेंडच्या वाणिज्य राजदूत मा. पेत्रा थेमान यांच्यासह सुप्रसिद्ध सिने अभिनेता जॅकी श्रॉफ, प्रसिद्ध सिने दिग्दर्शक सुभाष घई, भारतीय क्रिकेटपटू उमेश यादव, सिने अभिनेता अंकुश चौधरी, वरिष्ठ संपादक निलेश खरे, वरिष्ठ संपादक सरिता कौशिक या सर्व मान्यवरांचे शुक्रवार (ता. ११) रोजी शहरात आगमन झाले. यावेळी अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभपती शिवानी दाणी वखरे, विधी विशेष समिती सभापती कु. निधी तेलगोटे, दुर्बल घटक समिती कु. लक्ष्मी हत्तीठेले, नगरसेविका कु. दुर्गेश्वरी कोसेकर, मनपाचे सर्वश्री राजीव गौतम, राजेश दुपारे, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

भारतीय क्रीडापटू उमेश यादव हे मारबतीच्या उत्सवात असलेल्या नागरिकांच्या प्रचंड उत्साहाला पाहून भावनिक झाले. त्यांच्यासाठी हा अत्यंत रोमहर्षक क्षण असल्याचे आणि अशा विलक्षण गोष्टी फक्त नागपूर शहरातच होऊ शकतात असे सांगितले. नागपूरचा हा पारंपरिक व संस्कृतिक उत्सव जगभरापर्यंत पोहचावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. नागपूर हे आता छोटे राहीले नसून, मोठे व प्रगत झाले आहे. जेव्हा अशा वेगवेगळ्या गोष्टींचे आयोजन नागपूर शहरात होतात तेव्हा एक नागपूरकर म्हणून गर्व वाटत असल्याचे सांगितले.

सुभाष घई यांनी सांगितले की खूप कमी लोकांना माहिती आहे की नागपूर ही त्यांचे जन्मस्थान आहे. त्यामुळे नागपूर सोबत त्यांचे खास नाते आहे. नागपूरात होणारा मारबत उत्सव गेल्या १४५ वर्षांपासून होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# भंडारा येथे भीषण अपघात, ३ मुलांसह ९ जणांचा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**
भंडारा येथील पिंपळगाव रस्त्याजवळ नागपूर-रायपूर महामार्गावर ट्रक आणि पिकअप व्हॅनच्या धडकेत तीन मुलांसह आठ जणांचा मृत्यू झाला. तीन जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवारी सकाळी नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण रस्ता अपघातात तीन मुलांसह आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि इतर तीन जण गंभीर जखमी झाले.

हा अपघात भंडारा जिल्ह्यातील पिंपळगाव रस्त्यावरील भाऊ का ढाब्याजवळ घडला. प्राथमिक माहितीनुसार, ट्रक आणि पिकअप व्हॅनची जोरदार धडक झाली. दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून, त्यातील अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहे.अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि बचाव पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. स्थानिक रहिवाशांच्या मदतीने मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले. अपघातात जखमी झालेल्या तीन जणांना उपचारासाठी भंडारा जिल्ह्यातील साकोली उप-जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. भंडाराचे पोलीस अधीक्षक यांनी अपघातात आठ जणांचा मृत्यू झाल्याची आणि इतर तीन जण जखमी झाल्याची पुष्टी केली.

सासरी गेलेल्या लेकीला तीजच्या सणाला माहेरी आणण्याची छत्तीसगढमधील प्रथा. त्यासाठी नागपुरातून जामबाई वर्मा या त्यांची लेक मीनाक्षी आणि नात ग्रेशा या दोघींना माहेरी नेण्यासाठी छत्तीसगडला गेल्या होत्या. १४ तारखेला तीज सण साजरा करायचा या ओढीने मायलेकींचा प्रवास नागपूरच्या दिशेने सुरू झाला सुरू झाला. गाडीत जामबाई मुलगी मीनाक्षीच्या शेजारी बसल्या होत्या, तर मीनाक्षीची चिमुकली ग्रेशा तिच्या मांडीवर विसावली होती. पण माहेरच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचण्याआधीच पहाटेच्या काळोखात काळाने वाट अडवली आणि जामबाई, मीनाक्षी व तिची चिमुकली मुलगी ग्रेशा अशा एकाच कुटुंबातील तीन पिढ्यांचा दुर्दैवी अंत झाला.



संपादकीय लेखणीतून...

## मौनव्रत : कुटुंबातील तंट्यांवर रामबाण उपाय?

मौन व्रत म्हणजे काही ठराविक काळासाठी वाणीवर- बोलण्यावर नियंत्रण ठेवणे आणि पूर्णपणे शांत राहणे. ही एक प्राचीन भारतीय अध्यात्मिक आणि मानसिक साधना आहे. हिंदू, जैन धर्मात आणि बौद्ध धम्मातही या व्रताला विशेष महत्त्व आहे. मौन व्रताचा मुख्य उद्देश- १) मनाची शांतताः बोलणे बंद केल्यामुळे मनातील विचारांचा वेग कमी होतो आणि मानसिक शांतता मिळते. २) ऊजेर्ची बचतः बोलण्यासाठी शरीराची आणि मनाची खूप ऊर्जा खर्च होते. मौन पाळल्याने या ऊजेर्ची बचत होते. ३) आत्मपरीक्षणः माणूस जेव्हा बाह्य जगाशी संपर्क तोडतो, तेव्हा त्याला स्वतःच्या आत डोकावण्याची आणि आत्मपरीक्षण करण्याची संधी मिळते. ४) वाणीवर नियंत्रणः यामुळे रागावर नियंत्रण ठेवण्यास आणि विचारपूर्वक बोलण्याची सवय लागण्यास मदत होते.

मौन व्रत करण्याचे शास्त्रीय नियमः- १) कालावधी निश्चित कराः सुरुवातीला हे व्रत २ तास, ४ तास किंवा १ दिवसासाठी करावे. सराव वाढल्यावर याचा काळ वाढवता येतो. केवळ बोलणे बंद करणे म्हणजे मौन नाहीः २) मौन व्रतामध्ये फक्त तोंड बंद ठेवणे पुरेसे नाही, तर मनातही शांतता असावी लागते. ३ डिजिटल मौनः मौन व्रतादरम्यान मोबाईल, सोशल मीडिया, टीव्ही किंवा लॅपटॉप वापरणे टाळावे. कारण यामुळे मनाची शांतता भंग पावते. ४) इशाऱ्यांनी संवाद टाळावाः काही लोक न बोलता हाताने किंवा लिहून संवाद साधतात. मौन व्रतात असे करणे टाळावे, अन्यथा मनाला पूर्ण विश्रांती मिळत नाही.

मौन व्रताचे फायदे : १) मानसिक ताण कमी होतोः दररोजच्या धावपळीतून आणि वादांमधून सुटका मिळाल्याने मानसिक ताण वेगाने कमी होतो. २) एकाग्रता वाढतेः विद्यार्थ्यांसाठी आणि काम करणाऱ्या लोकांसाठी मौन राखल्याने स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढते. ३) शारीरिक आरोग्य सुधारतेः मौनामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते आणि मेंदूला विश्रांती मिळते. ४) अध्यात्मिक प्रगतीः ध्यान किंवा नामस्मरण करताना मौन पाळल्यास देवाशी किंवा आत्म्याशी जोडले जाणे सोपे होते. म्हणूनच थोर महात्मे सांगता- "मौनम् सर्वार्थ साधनम्॥"

प्रसिद्धीपराडमुख असणारे संतच महान होतात. माहिती उपलब्ध नसणारे, असे अनेक थोर संत महाराष्ट्रात होऊन गेले आहेत. त्यांचा भक्त परिवार आजही मोठा आहे. त्यांच्या महान कायार्नेच, भक्तांना अनुभव देण्याच्या सामथार्मुळेच ते महान झाले आहेत. समाधिस्थ झाले तरीही ते आपल्या भक्तांना अनुभव देत राहतात. भक्तांची प्रगती साधत राहतात. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली लिहतात-

"मौन गा तुझें राशिनांव।
आतां स्तात्री कें बांधों हाव॥
दिससी तेतुली भाव।
भजों काई ।।" (पवित्र ज्ञानेश्वरी अध्याय १७ वा, ओवी १५ वी.)

ओवीचा अर्थ - महाराज, मौन हें आपल्या जन्मराशीवरून काढलेंले आपलें नांव आहे, असें असल्याकारणानें मी स्तुति करण्याची उत्कट इच्छा कोठें बाळगू? जें तुझें स्वरूप मला दृश्यत्वेंकरून दिसत आहे, तें सर्व मिथ्या आहे, तर मग मी भजन कशाचे करावें?

पाटगावचे मौनी महाराज हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरू होते. ते नेहमी मौन धारण करून असत. फक्त समर्थ रामदास स्वामी यांच्याशीच ते संभाषण करत. त्यांच्यासमोरच ते हे मौन व्रत सोडत. यावरून समर्थ रामदास स्वामीही किती मोठे होते हे स्पष्ट होते. मौनी महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांना सन १६७६ मध्ये अनुग्रह दिला. कर्नाटक दौऱ्याच्या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांनी पाटगावच्या मौनी महाराजांची भेट घेतली. त्यावेळी त्यांना अनुग्रहाचा लाभ झाला. गुरूंचा अनुग्रह होण्यासाठी मोठे भाग्य लागते. छत्रपती शिवाजी महाराज आणि पाटगावचे मौनी महाराज यांच्या भेटीच्या प्रसंगाचे वर्णन बखरीमध्ये आढळते, पण मौनी महाराजांच्या विषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. ते कोणत्या पंथाचे, संप्रदायाचे होते, याचीही माहिती नाही. त्यांचे गुरू कोण? याचेही पुरावे उपलब्ध नाहीत. सध्याच्या युगात मौन व्रत पाळणारे भेटणेच अशक्य आहे. हं, पण संसदेत मौनी खासदार म्हणून ओळखणारे अनेक जण आहेत. विशेष म्हणजे हे मौनी खासदार प्रत्येक निवडणुकीत निवडून येतात. ३०-४० वर्षे तरी सलग सत्ता त्यांच्याच हातात असते. त्यांच्यावर मौनी खासदार म्हणून टीकाही होते, पण तरीही ते निवडून येतात. लोकमत त्यांच्या बाजूने असते. हे कसे? यावर संशोधन होणे गरजेचे आहे. काय खरंच त्यांना मौनाचा फायदा होतो का? कारण सध्या दंगेखोर नेत्यांपेक्षा असले मौनी नेतेच परवडले, असे जनतेला म्हणायचे तर नाही ना? सतत त्रस्त करणाऱ्या नेत्यांना जनता धडा शिकवते. ते फार काळ टिकत नाहीत. पण न बोलता कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मागे जनता उभी राहाते. हेच यातून दिसते. सत्तेत येण्यापूर्वी अनेक आश्वासने देणारे नेते सत्तेत येऊन काहीच करत नाहीत. सत्ता मिळाल्यानंतर ती उपभोगण्याकडेच त्यांचा कल असतो. अशा सत्ताधिशांची सत्ता फारकाळ टिकत नाही. चिरंतन सत्ता टिकण्यासाठी आपण काय केले? याची वाच्यता न करणे हेच योग्य आहे. याचा फायदा निश्चितच होतो-

"स्वकिर्ती कानी न ऐकावी ।
स्वकिर्ती मुखे न बोलावी ।"

हाच खरा नियम आहे. यासाठीच मौनाचे महत्त्व आहे. समाजकार्य करत राहायचे. पण त्याचा डांगोरा पिटाळायचा नाही. यातच खरा विकास दडला आहे. मौनाचे अनेक फायदे आहेत, पण हे व्रत सर्वसामान्यांना जीवन जगताना पाळता येणे कठीणच आहे. तरीही प्रयत्न करायला काहीच हरकत नाही. प्रयत्नांनी सर्व काही साध्य होते. सांसारिक जीवनात या मौन व्रताचा निश्चितच फायदा होतो. घरातील वादाच्या प्रसंगी, भांडण तंट्यामध्ये मौन धारण केल्यास हे वाद निवळू शकतात. मौनामुळे सहनशीलता येते. वयोवृद्ध, ज्येष्ठांना घरात उगाचच बडबड करून इतरांना त्रास देण्याची सवय असते. तसे ते मुद्दाम करत नसतात. ही त्यांची सवयच असते. याचा त्रास इतरांना होतो. हे त्यांच्या कधीही लक्षात येत नाही. तसे ही गोष्ट प्रत्येक कुटुंबात आढळतेच. यावरून वाद हे होतच असतात. ही प्रत्येक कुटुंबातील समस्या आहे. वयोवृद्धांच्या अशा वागण्यामुळेच वृद्धाश्रमांची गरज वाढत चालली आहे. शांत बसणे त्यांना कधी जमतच नाही. तारुण्यातही इतका उत्साह त्यांनी कधी दाखवलेला नसतो, पण म्हातारपणी त्यांना कामाचा मोठा उत्साह असतो. अशा गोष्टींचा कुटुंबातील घटकांना त्रास होतो. आयुष्याच्या शेवटच्या क्षणी तरी अध्यात्मातील या मौनव्रताचा अवलंब करावा, असे त्यांना वाटत नाही.

# उच्चपदस्थांच्या आत्महत्या आणि मानवी वास्तव

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

दिल्लीचे माजी मुख्य सचिव आणि ज्येष्ठ IAS अधिकारी राकेश मेहता (७५) यांचा मृतदेह ६ सप्टेंबर रोजी नोएडाच्या सेक्टर-८२ मधील त्यांच्या फ्लॅटमध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. २००७ ते २०१० या काळात त्यांनी दिल्ली प्रशासनाच्या सर्वोच्च पदाची जबाबदारी सांभाळली होती. पोलिसांना घटनास्थळी एक चिठ्ठी (सुसाईड नोट) सापडली असून, त्यात त्यांनी आपल्या मृत्यूसाठी कोणालाही जबाबदार धरलेले नाही. प्राथमिक माहितीनुसार, मेहता हे उच्च रक्तदाब आणि मधुमेह यांसारख्या दीर्घकालीन आजारांनी त्रस्त होते आणि गेल्या पाच वर्षांपासून ते नोएडात एकटेच राहत होते. याच आजारपणाला आणि त्यातून आलेल्या तणावाला कंटाळून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे.

दिल्लीचे माजी मुख्य सचिव आणि अत्यंत प्रतिभावान मानले गेलेले ज्येष्ठ कअर अधिकारी राकेश मेहता यांच्या नुकत्याच झालेल्या आत्महत्येने केवळ प्रशासकीय वतुर्ळालाच नव्हे, तर संपूर्ण देशाला आणि आपल्या समाजव्यवस्थेला हादरवून सोडले आहे. आयुष्याची अनेक दशके सत्तेच्या आणि प्रशासनाच्या सर्वोच्च शिखरावर घालवणाऱ्या, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील आयोजनाचे यशस्वी नेतृत्व करणाऱ्या या ७५ वर्षीय निवृत्त अधिकाऱ्याला आयुष्याच्या संध्याकाळी गळफास लावावासा वाटणे, हे अत्यंत विदारक आहे. ही घटना केवळ एका व्यक्तीचे वैयक्तिक दुःख नाही, तर ते आपल्या व्यवस्थेचे आणि आपण जपत असलेल्या उथळ सामाजिक मूल्यांचेही मोठे अपयश आहे. समाजात आज असा एक दृढ गैरसमज आहे की, उच्च शिक्षण, मोठी नोकरी, अमाप संपत्ती आणि अफाट सत्ता असली की माणसाचे जीवन आपोआप सुखी, सुरक्षित आणि तणावमुक्त होते. मात्र, अशा घटना या समजुतीला तडा देतात आणि दाखवून देतात की, यशाचा झगमगाट, भौतिक सुबत्ता आणि सार्वजनिक प्रतिष्ठेच्या आवरणाखाली माणसाचा जो भयानक आंतरिक संघर्ष आणि एकाकीपणा दडलेला असतो, तो जगाला बाहेरून कधीच दिसत नाही.

राकेश मेहता यांची ही घटना कोणतीही पहिली किंवा एकमेव वेळ नाही. यापूर्वीही हिमांशू रॉय यांच्यासारखे 'डॅशिंग' आणि गुन्हेगारांच्या मनात धडकी भरवणारे कद्धर अधिकारी, डी. के. रवी आणि मुकेश पांडे यांच्यासारखे तरुण व तडफदार कअर अधिकारी, तसेच कॉर्पोरेट क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी स्वतःची जीवनयात्रा अशाच प्रकारे स्वतःच्या हातांनी संपवली आहे. या सर्व घटनांचा सखोल अभ्यास केल्यास काही समान मानसिक आणि सामाजिक पदर उलगडतात. समाजाकडून आणि व्यवस्थेकडून या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना नकळतपणे 'सुपरमॅन' बनवले जाते. त्यांच्यावर प्रशासनाचा, राजकीय हस्तक्षेपाचा आणि लाखो लोकांच्या अपेक्षांचा प्रचंड मोठा दबाव असतो. 'मी एवढा मोठा अधिकारी आहे, मी कसा खचू शकतो?', 'मी कमकुवत दिसलो तर लोक काय म्हणतील?' या खोट्या प्रतिष्ठेच्या आणि अहंकाराच्या ओझ्याखाली ही माणसे स्वतःच्या वेदना, भीती, असुरक्षितता किंवा नैराश्य कोणाशीही वाटून घेत नाहीत. स्वतःला कायम 'स्ट्रॉंग' दाखवण्याच्या या जीवघेण्या अट्टाहासामुळे ते आतून पूर्णपणे पोकळ आणि एकाकी होत जातात.

आपल्या समाजव्यवस्थेने यशाची व्याख्या अत्यंत संकुचित करून केवळ पैसा, पद आणि सत्तेपुरती मर्यादित ठेवली आहे. आपण शालेय जीवनापासूनच मुलांना जीवनाच्या शर्यतीत केवळ 'पहिला नंबर' कसा मिळवायचा हे शिकवतो, पण दुर्दैवाने अपयश आलेच, तर ते कसे पचवायचे हे शिकवत नाही. बुद्धिमत्तेचा आणि यशाचा गौरव करताना, स्वतःच्या आणि इतरांच्या भावना समजून घेण्याच्या भावनिक बुद्ध्यांकाकडे व्यवस्थेचे पूर्णपणे दुर्लक्ष होते. परिणामी, जेव्हा ही उच्चपदस्थ मंडळी निवृत्त होतात, तेव्हा सभोवती असणारा स्वार्थी माणसांचा गराडा आणि अधिकाराची नशा अचानक नाहीशी होते. सत्तेची आणि अधिकाराची जागा एक भयाण रिकामेपणा घेतो. सत्तेत असताना जे लोक सभोवती असतात, ते त्या व्यक्तीला नव्हे, तर 'खुर्चीला' सलाम करणारे असतात. मनातील खळबळ कोणत्याही दबावाशिवाय किंवा संकोचाशिवाय ज्यांच्यासमोर मोकळेपणाने व्यक्त करता येईल, अशी हक्काची आणि निःस्वार्थी माणसे या यशाच्या आंधळ्या प्रवासात अनेकदा मागे सुटलेली असतात. याच गर्दीतील एकटेपणामुळे निवृत्तीनंतरचे जीवन अनेकांसाठी एकाकी आणि असह्य बनत जाते.

निसर्गतः प्रत्येक सजीवामध्ये जगण्याची अत्यंत प्रबळ इच्छा असते. मरणाची भीती ही माणसाची सर्वात मोठी नैसर्गिक भीती आहे. तरीही ही माणसे मृत्यूला का कवटाळतात? याचे मुख्य उत्तर त्यांच्या उतारवयातील आजारपणात आणि परावलंबित्वात दडलेले आहे. आयुष्यभर स्वतःच्या अटींवर जगलेली आणि हजारो लोकांवर हुकूमत गाजवणारी ही माणसे जेव्हा म्हातारपणामुळे किंवा गंभीर आजारपणामुळे (उदा. कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, कंपवात) साध्या दैनंदिन कामांसाठीही दुसऱ्यांवर अवलंबून राहू लागतात, तेव्हा त्यांचा स्वाभिमान प्रचंड दुखावला जातो. वेदनांची असह्यता, भविष्यातील अंधकार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'आपण आता आपल्या मुलांवर किंवा कुटुंबावर ओझे होत आहोत' ही अपराधीपणाची बोचरी भावना त्यांना आतून पोखरते. दीर्घकालीन आजारपण आणि एकटेपणामुळे मेंदूत रासायनिक बदल होतात आणि व्यक्ती 'क्लिनिकल डिप्रेशन' (तीव्र नैराश्य) या गंभीर वैद्यकीय अवस्थेत जाते. या अवस्थेत योग्य-अयोग्य विचार करण्याची क्षमता नष्ट होते आणि 'असे लाचार आणि परावलंबी होऊन जगण्यापेक्षा मरण पत्करलेले बरे,' या विद्धवंसक भावनेतून ते टोकाचा निर्णय घेतात.

या सर्व दुःखद घटना आपल्या समाजासाठी एक अत्यंत गंभीर इशारा आणि आत्मपरीक्षणाची संधी आहेत. भविष्यात अशा हृदयद्रावक घटना टाळायच्या असतील, तर आपल्याला वैयक्तिक आणि कौटुंबिक पातळीवर 'संवादाचे स्वरूप' मुळापासून बदलावे लागेल. घरात असे एक सुरक्षित वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे, जिथे केवळ यशाचेच गोडवे गायले जाणार नाहीत, तर अपयश, भीती, असुरक्षितता आणि तणाव यावरही कोणत्याही संकोचाविना मोकळेपणाने बोलता येईल. विशेषतः घरातील ज्येष्ठ आणि आजारी व्यक्तींसोबतचा आपला संवाद केवळ 'तुम्ही वेळेवर औषधे घेतली का?' किंवा 'काही आणायचे आहे का?' इथपर्यंत मर्यादित न राहता, 'आज तुम्हाला आतून कसे वाटत आहे? मनात काही नको ते विचार किंवा भीती वाटत आहे का?' इथपर्यंत खोलवर गेला पाहिजे. अशा वेळी त्यांना सल्ले देण्याऐवजी किंवा त्यांच्या भावनांची खिल्ली उडवण्याऐवजी, केवळ त्यांचे म्हणणे शांतपणे आणि संवेदनशीलतेने ऐकून घेणे हा त्यांच्यासाठी सर्वात मोठा भावनिक आधार ठरू शकतो. "तुम्ही आमच्यासाठी ओझे नाही, तर आमच्या घराचा भक्कम आधार आहात" या आश्वासक शब्दांची आणि मायेच्या स्पर्शाची त्यांना सर्वाधिक गरज असते.

आत्महत्या करणारी व्यक्ती 'मरू इच्छित असते' असे नाही, तर तिला केवळ त्या 'असह्य वेदना आणि लाचारीतून सुटका' हवी असते. जेव्हा जगण्याची किंमत मरणयातनांपेक्षा जास्त होते, तेव्हा माणूस हा निर्णय घेतो. म्हणूनच, घरात कोणी आजारी किंवा वृद्ध असेल, तर त्यांना फक्त 'औषधांची' नाही, तर "तुम्ही आमच्यासाठी ओझे नाही, तर आमचा आधार आहात" या शब्दांची आणि स्पशार्ची सर्वाधिक गरज असते.आपण अशा एका समाजव्यवस्थेची निर्मिती केली आहे जी माणसाला 'यंत्र' बनवत आहे. आपण जगायला विसरून केवळ 'मिळवण्याच्या' मागे धावत आहोत, आणि इथेच आपली सर्वात मोठी चूक होत आहे. लहान मुलांवर शालेय जीवनापासूनच अभ्यासाचा आणि केवळ 'यशस्वी' होण्याचा जो अवास्तव दबाव टाकला जातो, तिथूनच या सर्व समस्येची सुरुवात होते.

समाजाने 'मानसिक आरोग्याबाबत' असलेली लाज किंवा संकोच आता कायमचा सोडून दिला पाहिजे. शरीराप्रमाणेच मनही आजारी पडू शकते आणि जसे मधुमेहावर किंवा हृदयरोगावर आपण डॉक्टरांकडे जातो, तसेच नैराश्यावर मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेणे अत्यंत स्वाभाविक आहे, हे मूल्य संस्कारांप्रमाणे पुढच्या पिढीत रुजवले पाहिजे. पद, पैसा आणि प्रतिष्ठा हे जीवनाचे केवळ काही पैलू आहेत, ते संपूर्ण जीवन नाही. जीवनाची खरी श्रीमंती ही आपल्या माणसांच्या साथीमध्ये, निखळ संवादात आणि एकमेकांना समजून घेण्यात दडलेली असते, हा अत्यंत महत्त्वाचा आणि शाश्वत धडा या निमित्ताने आपण सर्वांनी घेण्याची वेळ आली आहे.

- ९५६१५९४३०६

# महिला आशिया चषक २०२६ : भारतीय संघाचा आशिया कपमध्ये इतिहास, बांगलादेशला हरवून अंतिम फेरीत प्रवेश!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय महिला संघाने महिला आशिया कप २०२६ च्या उपांत्य फेरीत बांगलादेशला ४० धावांनी हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला. हरमनप्रीत कौर आणि तिचा संघ १३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या विजेतेपदाच्या सामन्यात पाकिस्तान किंवा श्रीलंका यांच्यापैकी एकाचा सामना करेल.

### भारत विरुद्ध बांगलादेश उपांत्य फेरीतील ठळक मुद्दे:

भारतीय संघाने उपांत्य फेरीत बांगलादेशला ४० धावांनी पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. या सामन्यात एकूण ११ षटकार मारले गेले, ज्यामुळे महिला आशिया कपच्या इतिहासात १० किंवा अधिक षटकार मारलेला हा पहिलाच सामना ठरला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २० षटकांत सहा गडी गमावून १४९ धावा केल्या. १५० धावांचे लक्ष्य गाठताना बांगलादेश महिला क्रिकेट संघ केवळ १०९ धावाच करू शकला.

### शेफालीने पुन्हा एकदा धमाका केला

बांगलादेशची कर्णधार निगार सुलतानाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. स्मृती मंधाना अवघ्या दोन धावांवर बाद झाली. त्यानंतर शेफाली वर्मा आणि प्रतिका रावल यांनी दुसऱ्या विकेटसाठी ५० धावा जोडल्या. प्रतिका रावलही २० धावांवर बाद झाली. त्यानंतर हरमनप्रीत कौरने वमासीबत भागीदारी करून संघाला ९० धावांच्या पुढे नेले. शेफालीने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि सात चौकार व तीन षटकारांसह ४० चेंडूंमध्ये ६४ धावा करून ती बाद झाली. हरमनप्रीत कौरने सावकाश खेळी केली आणि २८ चेंडूंमध्ये २४ धावांवर नाबाद राहिली. रिचा घोषने १६ चेंडूंमध्ये २१ धावा आणि दीप्ती शर्माने ६ चेंडूंमध्ये १३ धावा करून भारतीय संघाला १४९ धावांपर्यंत पोहोचवले. बांगलादेशला केवळ १०९ धावा करता आल्या. १५० धावांचे लक्ष्य गाठताना बांगलादेशची सुरुवात संमिश्र झाली. २६ धावांवर पहिली विकेट पडली आणि ८३ धावांवर निम्मा संघ बाद झाला. मात्र, एकही फलंदाज स्थिर गती राखू शकला नाही, परिणामी २० षटकांच्या अखेरीस बांगलादेशला केवळ १०९ धावा करता आल्या.

भारतीय संघ सलग दहाव्यांदा महिला आशिया कपच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. यापूर्वी भारताने नऊ वेळा विजेतेपदाचा सामना गाठला असून, त्यात सात वेळा विजय आणि दोन वेळा पराभव पत्करला आहे. २०१८ च्या आशिया कपच्या अंतिम सामन्यात बांगलादेशने भारताला पराभूत केले होते, तर २०२४ च्या महिला आशिया कपचा अंतिम सामना श्रीलंकेने जिंकला होता. आता भारतीय संघ १३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात पाकिस्तान किंवा श्रीलंकेचा सामना करेल.

महिला आशिया कप २०२६ मधील भारत आणि बांगलादेश यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना एकतर्फी झाला. पुरुष क्रिकेटप्रमाणेच, बांगलादेश आणि भारत यांच्यात कोणतीही तुलना होऊ शकत नाही. असे असूनही, बांगलादेशी खेळाडू मैदानावर सतत अडचणी निर्माण करत आहेत. अशीच परिस्थिती महिला आशिया कपच्या उपांत्य फेरीत पाहायला मिळाली. मात्र, भारतीय महिला संघाच्या खेळाडूंनी संधी मिळताच चोख प्रत्युत्तर दिले. महिला आशिया कपच्या उपांत्य फेरीत भारताने बांगलादेशला पराभूत केले.

उपांत्य फेरीत भारतीय संघाची सलामीवीर स्मृती मंधाना स्वस्तात बाद झाली. ती फक्त दोन धावा करू शकली. स्मृतीने ऑफ-स्पिनर सुलताना खातूनच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला. तिची टायमिंग चुकली आणि मिड-ऑनला उभ्या असलेल्या शोर्ना अख्तरने सोपा झेल घेतला. झेल घेतल्यानंतर तिने शांततेचा इशारा केला आणि दुसरा हात वर करून आनंद साजरा केला.

### नंदिनी शर्माने बदला घेतला

भारतीय वेगवान गोलंदाज नंदिनी शर्माने बांगलादेशला त्यांच्याच शब्दांत प्रत्युत्तर दिले. नंदिनीने भारतासाठी डावाचे शेवटचे षटक टाकले. तोपर्यंत संघाचा विजय निश्चित झाला होता. तिच्या गोलंदाजीवर प्रेमा रावतने फहिमा खातूनचा झेल घेतला. विकेट घेतल्यानंतर नंदिनीने शोर्ना अख्तरप्रमाणेच जल्लोष केला. विशेष म्हणजे, त्यावेळी शोर्ना नॉन-स्ट्रायकरच्या टोकाला उभी होती.

२२ वर्षीय श्री चरानी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताची आघाडीची फिरकी गोलंदाज बनली आहे. तिने बांगलादेशविरुद्धच्या आशिया कप उपांत्य फेरीच्या सामन्यातही उत्कृष्ट गोलंदाजी केली. श्री चरानीने चार षटकांच्या स्पेलमध्ये केवळ १४ धावा देत एक बळी घेतला, ज्यात एका निर्धाव षटकाचा समावेश होता. बांगलादेशविरुद्धचा सामना जिंकून भारताने अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

### श्री चरानीने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५० बळी पूर्ण केले

श्री चरानीने गुरुवारी विक्रमांच्या पुस्तकात आपले नाव कोरले. ती महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५० बळी घेणारी भारतीय गोलंदाज ठरली आहे. चरानीने आपल्या २९व्या सामन्यात हा पराक्रम केला, ज्यामुळे या फॉरमॅटमध्ये सर्वात जलद ५० बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या सर्वकालीन यादीत ती संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर पोहोचली आहे.

सर्वात जलद ५० बळी घेण्याचा विक्रम चीनच्या मेंगटिंग लिऊच्या नावावर आहे. तिने २८ सामन्यांमध्ये हा पराक्रम केला होता. न्यूझीलंडची ली कॅस्परेक आणि वेस्ट इंडिजची अनिसा मोहम्मद यांनीही हा पराक्रम करण्यासाठी २९ सामने घेतले होते. श्री चरणीनेही आता त्यांच्या पंक्तीत स्थान मिळवले आहे.

### महिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वात जलद ५० बळी

२८ सामने - मेंगटिंग लिऊ (चीन)
२९ सामने - ली कॅस्परेक (न्यूझीलंड)
२९ सामने - अनिसा मोहम्मद (वेस्ट इंडिज)
२९ सामने - श्री चरणी (भारत)
३४ सामने - सोफी एक्लेस्टोन (इंग्लंड)

### गोलंदाजी क्रमवारीत श्री चरणी अव्वल स्थानी

श्री चरणीने २०२५ मध्ये भारतासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. आतापर्यंत तिने २९ सामन्यांमध्ये ५० बळी घेतले आहेत. तिने ६.७४ च्या इकॉनॉमी रेटने धावा दिल्या आहेत. तिची सर्वोत्तम कामगिरी १२ धावांत ४ बळी ही आहे. ती महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या गोलंदाजी क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आहे. महिला आशिया कपमध्ये श्री चरणीने ४ सामन्यांमध्ये केवळ ३.२८ च्या इकॉनॉमी रेटने धावा देत ८ बळी घेतले आहेत.

आशिया कप २०२६ च्या पहिल्या उपांत्य फेरीतील पंचांचा एक निर्णय चर्चेचा विषय बनला आहे. बांगलादेशच्या डावाच्या १० व्या षटकात, बांगलादेशची कर्णधार निगार सुलतानाने बॅट आतून बाहेरच्या बाजूला वळवून एक फटका मारला. चेंडू थेट गोलंदाज दीप्तीकडे गेला. तिने धावबाद करण्यासाठी चेंडू फेकला, पण सुलतानाने चेंडूला लाथ मारली आणि तो यष्टींना लागला नाही. नियमांनुसार, सुलतानाने चेंडू यष्टींसमोर थांबवला होता. अशा परिस्थितीत तिला बाद दिले जाऊ शकले असते, पण पंचांनी तसे केले नाही आणि ती खेळत राहिली. अखेरीस, ती १९ धावांवर बाद झाली.

### निगार सुलतान - बॅट आतून बाहेर वळवून खेळलेला फटका

या सामन्याच्या दुसऱ्या डावात बांगलादेशसमोर १५० धावांचे लक्ष्य होते. संघाची सुरुवात विशेष प्रभावी नव्हती. पहिल्या सहा षटकांत केवळ २६ धावा झाल्या होत्या. विजय मिळवण्यासाठी बांगलादेशला मधल्या षटकांमध्ये वेगाने धावा करणे आवश्यक होते. १० व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर, निगार सुलतानाने रिव्हर्स स्वीप मारण्याचा प्रयत्न केला, पण दीप्तीने फुलटॉस टाकला. सुलतानाला बचाव करावा लागला आणि तिने बॅटच्या मागच्या बाजूने फटका मारला. चेंडू थेट दीप्तीकडे आला, तिने तो यष्टींवर फेकून सुलतानाला धावबाद केले. सुलताना आधीच क्रीजमध्ये असली तरी, तिने चेंडूला लाथ मारून तो यष्टींवर आदळण्यापासून वाचवला.

एकंदरीत या सामन्यात फार मोठी धावसंख्या भारताने उभी केली नसली तरी भारतीय गोलंदाजांनी खेळपट्टीचा अचूक फायदा घेत प्रतिपक्षाला पूर्ण सामन्यात कधीही डोके वर काढण्याची संधी दिली नाही. परिणामतः फायनलमध्ये सहज प्रवेश करून विजेते पदावर दावा मजबूत आहे. मात्र तो चषक जिंकल्यानंतरही भारताला मिळेल का? हा प्रश्न अजूनही अनुत्तरीतच आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# १२ तास दगडांचा थरार !

# गोटमार मेळ्यात ४३८ हून अधिक जखमी

## सकाळी ६ वाजता सुरू झालेली दगडफेक रात्री ६ वाजता थांबली, तीन खेळाडूंच्या पायांची हाडे फ्रॅक्चर, सात जणांच्या डोक्याला दुखापत, चौघांना नागपूर-वरूडला रेफर



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
मध्य प्रदेशातील पांढुर्णा जिल्ह्यातील पारंपरिक गोटमार मेळ्यात यंदा तब्बल १२ तास दगडांचा थरार पाहायला मिळाला. तान्हा पोळ्याच्या शुभमुहूर्तावर होणाऱ्या या पारंपरिक गोटमारमध्ये पांढुर्णा आणि सावरगाव पक्ष आमनेसामने आले. सकाळी ६ वाजता सुरू झालेली दगडफेक अखेर रात्री ६ वाजता थांबली. दिवसभर झालेल्या दगडफेकीत ४३८ हून अधिक नागरिक जखमी झाल्याची माहिती आहे.

जाम नदीच्या दोन्ही तीरांवर सकाळपासूनच नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. पारंपरिक गोटमारला सुरुवात होताच दोन्ही पक्षांकडून एकमेकांच्या दिशेने दगडफेक करण्यात आली. सुरुवातीला मर्यादित स्वरूपात असलेली दगडफेक काही वेळातच तीव्र झाली. दगडांचा मारा वाढत गेल्याने अनेक नागरिक जखमी झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी आरोग्य केंद्रे व रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले.

गोटमारमध्ये सहभागी तीन खेळाडूंच्या पायांची हाडे फ्रॅक्चर झाली असून, सात जणांच्या डोक्याला दुखापत झाली आहे. एका खेळाडूच्या नाकालाही दुखापत झाली. गंभीर जखमी झालेल्या चौघांना पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आले. त्यापैकी तिघांना नागपूर येथे, तर एका जखमीला वरूड येथे हलविण्यात आले. जखमींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने आरोग्य विभागाने उपचारासाठी विशेष व्यवस्था सज्ज ठेवली होती.

गोटमार मेळ्याच्या पार्श्वभूमीवर मध्य प्रदेश प्रशासनाने यंदा चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. मोठ्या प्रमाणात पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले होते. परिस्थितीवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष होते. तसेच गोटमारमध्ये वापरल्या जाणाऱ्या गोफणीवर प्रशासनाने बंदी घातली होती. मात्र,



पारंपरिक दगडफेकीमुळे दिवसभरात मोठ्या संख्येने नागरिक जखमी झाले. दरम्यान, आमदार नीलेश उईके यांनीही गोटमार मेळास्थळी उपस्थिती लावली. परंपरेनुसार त्यांनी पांढुर्णा पक्षाच्या वतीने सावरगाव पक्षाच्या दिशेने दगड फेकून गोटमारमध्ये सहभाग नोंदविला. पांढुर्णा आणि सावरगाव या दोन पक्षांमध्ये होणाऱ्या गोटमारला धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असल्याचे मानले जाते. तान्हा पोळ्याच्या दिवशी होणाऱ्या या पारंपरिक मेळ्यासाठी दरवर्षी हजारो नागरिकांची गर्दी होते. यंदाही सकाळपासूनच जाम नदीच्या दोन्ही काठांवर मोठी गर्दी झाली होती.

दिवसभराच्या दगडफेकीनंतर सर्वांचे लक्ष सावरगाव पक्षाच्या झेंड्याकडे लागले होते. अखेर रात्री ६ वाजता पांढुर्णा पक्षाने सावरगावचा झेंडा तोडला. त्यानंतर हा झेंडा चंडिका मातेच्या मंदिरात आणण्यात आला. मंदिरात झेंडा अर्पण करून धार्मिक विधी पार पाडण्यात आले आणि त्यानंतर गोटमार मेळ्याच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

तब्बल १२ तास चाललेल्या या पारंपरिक गोटमारमध्ये ४३८ हून अधिक नागरिक जखमी झाल्याने यंदाचा गोटमार मेळा चर्चेचा विषय ठरला आहे. प्रशासनाचा कडेकोट बंदोबस्त, गोफणीवरील बंदी आणि मोठ्या प्रमाणातील जखमींची संख्या यामुळे यंदाच्या गोटमार मेळ्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले.

## विशेष सखोल पुनरिक्षणांतर्गत मतदारांनी प्रारूप यादीत आपले नाव तपासावे : एसडीओ रामटेक

### रामटेक विधानसभा मतदारसंघातील ५५ हजार ५६६ मतदारांची नावे प्रारूप यादीतून वगळली

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर-२०२६) अंतर्गत सुरू असलेल्या मतदार यादी पुनरिक्षण प्रक्रियेत ५९-रामटेक विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत आपले नाव आहे किंवा नाही, याची



पडताळणी करावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांनी केले. याबाबत ९ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन पुनरिक्षण प्रक्रियेची माहिती देण्यात आली. रामटेक विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ९० हजार ८६५ मतदार असून, प्रारूप यादीत २ लाख ३५ हजार २९९ मतदारांचा समावेश आहे. विविध कारणांमुळे ५५ हजार ५६६ मतदारांची नावे प्रारूप यादीतून वगळण्यात आली आहेत.

यामध्ये स्थलांतरित २९ हजार १०४, मृत १६ हजार १२९, नावाशी जुळणी न झालेले १३ हजार २०३, अनामोल १० हजार १२८, दुबार ६ हजार १५४, गैरहजर ४ हजार ७३ आणि इतर १०६ मतदारांचा समावेश आहे. मतदार यादीतील त्रुटी किंवा हरकती असल्यास ३० सप्टेंबरपर्यंत हरकती नोंदविता येणार आहेत. नव्या मतदारांच्या नोंदणीसाठी नमुना ६, दुबार, मृत किंवा स्थलांतरित मतदारांचे नाव वगळण्यासाठी नमुना ७, तर नावातील दुरुस्तीसाठी नमुना ८ अर्ज संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे किंवा निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन भरता येईल. प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या मतदारांची यादीही ऑनलाइन पाहता येणार आहे. तसेच २३ हजार ३३१ मतदारांना २१ सप्टेंबरपासून सुनावणीसाठी नोटीस बजावण्यात येणार आहे. सुनावणीच्या सात दिवस आधी संबंधित मतदारांना मतदान क्षेत्राजवळील ग्रामपंचायत, मतदान केंद्र किंवा शासकीय कार्यालयात नोटीस देऊन दिनांक, वेळ व ठिकाण कळविण्यात येईल. संबंधित मतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह सुनावणीस उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन प्रियेश महाजन यांनी केले.

## डोरली येथे वृद्धाची लाकडी काठी व पट्ट्याने मारहाण करून हत्या, चार तरुणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**
पारशिवनी पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा डोरली येथे मोबाईल चोरीच्या संशयावरून ५६ वर्षीय इसमास बेदम मारहाण करून ठार मारल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पारशिवनी पोलीस स्टेशन येथे चार आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृतकाचे नाव राजू भोलासिंग तांडेकर (५६) राहणार डोरली तालुका पारशिवनी असे आहे. तर आरोपीतांचे नावे
आलोक प्रमोद गजभिये, आदित्य केशवराव देशपांड, साहिल पप्पू केवट, विशाल मारुतीराव वाघमारे, (सर्व रा. डोरली, वय अंदाजे १८ ते २० वर्षे) असे आहेत.
फिर्यादी अजय राजू तांडेकर, वय २६ वर्ष, रा. डोरली, तह. पारशिवनी, यांनी दिलेल्या तक्रारीवरून चारही आरोपी विरुद्ध खूनाचा गुन्हा नोंदविण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार घटना अशी आहे की, घटना १० सप्टेंबर रोजीचे रात्री ०१.०० ते पहाटे ०५.१५ वाजेच्या दरम्यान मौजा डोरली येथे घडली.फियार्दीत नमूद केल्याप्रमाणे, आरोपींनी मृतक राजू भोलासिंग तांडेकर, वय ५६ वर्ष यांना "मोबाईल चोरला का" असे म्हणत लाकडी काठीने व चामड्याच्या पट्ट्याने मारहाण केली. मारहाणीमुळे त्यांच्या पाठीवर वळाचे वण उठले होते. त्यानंतर आरोपींनी त्यांना गावातील वडाच्या झाडाखाली फेकून दिले.
घटनेची माहिती मिळताच फियार्दीने वडिलांना प्राथमिक आरोग्य केंद्र, डोरली येथे उपचारासाठी नेले असता, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.
चारही आरोपींनी संगनमत करून मारहाण केल्याने राजू तांडेकर यांचा मृत्यू झाल्याचे फियार्दीत म्हटले आहे. यावरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम १०३(१), ३(५) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पुढील तपास पारशिवनी चे सपोनी तथा ठाणेदार किशोर शेरकी हे करीत आहे. मात्र त्याच रात्री सदर घटनेत पृथ्वीराज डोंगरे राहणार डोरली हे सुद्धा जखमी होऊन स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्र येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते अशी स्थानिकांत चर्चा असून पोलीस अहवालात याची नोंद दिसून आली नाही.

## दिघोरा येथे तान्हा पोळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
तान्हापोळ्यानिमित्त हनुमान मंदिर (दिघोरा) मित्र परिवार आणि देवा ग्रुप फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सार्वजनिक तान्हापोळ्याला बालगोपालांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.
कार्यक्रमाला ठाणेदार रविंद्र मस्कर, उपनिरीक्षक सचिन उरकुडे, संदीप निंबार्ते, नगरसेवक नजीम बेग, कांचन बालपांडे, यांच्यासह अक्षय साखरकर, श्रीकांत बालपांडे आणि शाहुल ढोणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तान्हापोळ्यानिमित्त विविध आकर्षक बक्षिसे ठेवण्यात



आली होती. नंदीबैलांची छाननी करून उत्कृष्ट नंदीबैलांना पुरस्कार देण्यात आले. प्रथम क्रमांक सानिया सोनट्टेके, द्वितीय श्रेयांश बालपांडे, तृतीय निवि निंबार्ते, चतुर्थ अध्यांक्ष गुप्ता, पाचवा वैष्णवी रक्षीये आणि सहावा टुकू राहाटे यांनी पटकावला.

## शेती आमची, अधिकारही आमचा, सण फ्लॅग आयर्न स्टील कोल लिमिटेडविरोधात पोळ्यातून शेतकऱ्यांचा एल्गार

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**
तालुक्यातील नांदगाव पोडे येथील शेतकऱ्यांनी सण फ्लॅग आयर्न स्टील कोल लिमिटेडविरोधात तीव्र विरोध व्यक्त करीत बैल पोळा सणाला आंदोलनाचे स्वरूप दिले. शेती, जमीन आणि गावाच्या अधिकारांवर कोणत्याही प्रकारे गदा आणली जाऊ नये, या भूमिकेतून शेतकऱ्यांनी सजविलेल्या बैलजोड्यांच्या माध्यमातून कंपनीविरोधात आपला संताप व्यक्त केला.
पोळा हा शेतकरी आणि बैलांच्या नात्याचा सण मानला जातो. याच पारंपरिक सणाच्या माध्यमातून नांदगाव-पोडे परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतीच्या हक्काचा मुद्दा ठळकपणे मांडला. बैलजोड्यांना सजवून त्यांच्या अंगावर तसेच परिसरात कंपनीविरोधातील संदेश प्रदर्शित करण्यात आले. यावेळी शेती आमची, कोणाच्या बापाची नाही, गाव आमचा,




अधिकार आमचा आणि जय जवान, जय किसान अशा घोषणा देत शेतकऱ्यांनी विरोध नोंदविला. सण फ्लॅग आयर्न स्टील कोल लिमिटेडच्या प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, आपल्या शेती व गावाच्या भवितव्याबाबत शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. पारंपरिक पोळ्याच्या उत्सवाला विरोध प्रदर्शनाची जोड देत शेतकऱ्यांनी आपल्या भावना प्रशासन आणि संबंधित कंपनीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. शेतजमीन ही केवळ उपजीविकेचे साधन नसून आमच्या कुटुंबाच्या अस्तित्वाचा आधार आहे. गावाच्या हिताला बाधा पोहोचविणारा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केली.
दरम्यान, पोळ्यासारख्या पारंपरिक आणि भावनिक सणाच्या माध्यमातून कंपनीविरोधातील शेतकऱ्यांचा असंतोष उघडपणे समोर आल्याने नांदगाव पोडे परिसरातील जमीन व प्रकल्पाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागण्या व आक्षेप गांभीर्याने घेऊन त्यांच्याशी संवाद साधावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

थोडक्यात

## समर्थ गजानन सोसायटीत तान्हा पोळा उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
भारतीय शेतकरी संस्कृतीची ओळख आणि बैलांप्रती कृतज्ञतेची भावना लहान मुलांमध्ये रुजावी, या उद्देशाने श्री समर्थ गजानन सोसायटीतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ रोजी नागोबा मंदिर परिसरात तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले. लहान मुलांनी शेतकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी होत नंदीबैलांची आकर्षक सजावट केली. त्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमाला तब्बल २६ वर्षांची परंपरा असून, ती अखंडितपणे सुरू ठेवण्यासाठी परिसरातील युवक श्रीकांत उके, हितेश तिजारे, भूषण कुकुड्डे, रिंकू कुंभारे, पारस कुकुड्डे, नितेश धोंगडी व सचिन हिवरकर यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दांडेकर सर यांनी केले, तर मधुकर खडसे यांनी आभार मानले. नंदीबैल सजावट व वेशभूषा स्पधेर्तील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. प्रथम पारितोषिक दिवेश ओंकार बोडके, द्वितीय भूमील गणेश तर तृतीय पारितोषिक कौस्तुकी रोकडे यांनी पटकावले. ताशी महागावकर, विधी सचिन फसाटे व विओम धनपाले यांना सांत्वनपर बक्षिसे देण्यात आली.
कार्यक्रमाला अरुण तैले, नामदेव कुकुड्डे, सुखदेव रोकडे, अशोकराव तैले, ओंकार बोडके, झाडे साहेब, उके साहेब, प्रमोद येळणे, सुखदेवराव रोकडे, शोभाताई कुकुड्डे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लहान मुलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि पारंपरिक वेशभूषा व सजविलेल्या नंदीबैलांमुळे तान्हा पोळ्याला विशेष रंगत आली. २६ वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा सुंदर प्रयत्न म्हणून या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

## ऑल इंडिया उलेमा बोर्ड-मुतवल्ली विंग की ओर से १२ सितंबर को विशेष मार्गदर्शन कार्यक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मुस्लिम समाजातील युवकांना पोलीस सेवेसह विविध शासकीय सेवांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ऑल इंडिया उलेमा बोर्ड-मुतवल्ली विंगच्या वतीने विशेष सामाजिक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात शनिवारी, १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता. जाफरनगर येथील, हल्दीराम जवळील सीझन हॉलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात संघटनेच्या रिजनल कार्यालयाचे उद्घाटन तसेच संघठन विस्तार आणि सामाजिक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.
रिजनल कार्यालयाचे उद्घाटन वि. के. परदेशी, आयपीएस, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग, नागपूर यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. कार्यक्रमात विशेषतः पोलीस भरतीसंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार असून, मुस्लिम समाजातील युवकांनी पोलीस सेवेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, यासाठी आवश्यक माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे. युवकांना शासकीय सेवांच्या संधी, भरती प्रक्रियेची माहिती तसेच तयारीसंदर्भात मार्गदर्शन मिळावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी हाजी सोहेल पटेल अशरफी यांनी मुस्लिम समाजातील युवकांनी या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. समाजातील तरुणांनी शिक्षणा सोबतच पोलीस, प्रशासन आणि इतर शासकीय सेवांमध्ये पुढे येणे गरजेचे आहे. त्यासाठी संघटनेच्या माध्यमातून आवश्यक मार्गदर्शन आणि जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. १२ सप्टेंबर रोजी, शनिवारी होणाऱ्या या कार्यक्रमाला मुस्लिम समाजातील युवक, पालक, सामाज बांधव व इतरही कार्यकर्ते आणि सर्व धर्माच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ऑल इंडिया उलेमा बोर्ड- मुतवल्ली विंग च्यावतीने करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला ऑल इंडिया उलेमा बोर्ड-मुतवल्ली विंगचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी सोहेल पटेल अशरफी, अँड. फातिमा पठान, राजू चव्हाण, सय्यद सामी अतेशाम हुसेन, सय्यद सिंकदर, जावेद अन्सारी, जफर कुरेशी यावेळी उपस्थित होते.

## धानोली येथे तान्हा पोळा साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
अरोली - कोदामेंढी जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येत असलेल्या धानोली येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही तान्हा पोळा उत्साहात व शांततेत साजरा करण्यात आला. उत्कृष्टपणे लाकडी नंदीबैल सजवून आणणाऱ्या मुलांना पारितोषिके देऊन सर्व नंदीबैल घेऊन येणाऱ्या मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी सरपंच अमोल नरोले, उपसरपंच अमित तिल्लीखेडे, सर्व ग्रामपंचायत सदस्यगण, गावातील प्रतिष्ठित नागरिक सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## विजया श्रीरामवार यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
रेशीमबाग रहिवासी विजया दिलीप श्रीरामवार यांचे निधन झाले. त्या ६१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा व आप्तपरिवार आहे. अन्त्यसंस्कार शुक्रवार, ११ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता गंगाबाई घाट येथे करण्यात येईल.

थोडक्यात

## रामटेक येथे तान्हा पोळा उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
रामटेक शहर मध्ये १५ व ग्रामिणमध्ये ४० असे एकूण ५५ पेक्षा अधिक तान्हा पोळ्याचे आयोजन विविध मंडल मार्फत करण्यात आले. गांधी वार्ड रामटेक येथे स्व. नंदकिशोर जयस्वाल आडजात पोळ्याचे आयोजन बजरंग मेहर तर्फे करण्यात आले. बक्षीस वितरण राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे हस्ते करण्यात आले. या वेळी आनंदधामचे संस्थापक लक्ष्मणराव मेहर, राजेश कोल्हे, प्रणय हेडावू, मनोहर पंडे, पल्लवी जयस्वाल, आनंद मेहर, जेष्ठ नागरीक मंडळ अध्यक्ष वामन नायगांवकर, दिपक गिरघर सहित आदि उपस्थित होते. मुलांना आकर्षक नंदी बैल सजावट व आकर्षक पोशाख करीता रोख बक्षीस दिले.
गांधी वार्ड मित्र परिवार तर्फे पोळ्याचे आयोजन केले. ठाणेदार राजेश थोरात यांचे हस्ते दोन सायकल व एक ट्राली बॅगचे वाटप मुलांना करण्यात आले. यावेळी पोळा समितीचे अध्यक्ष नितीन वेरुळकर, वनमाला चौरागडे, निलेश अंबागडे, राधेभाई सुनवानी, संजय खजूरे, आदि उपस्थित होते. रामतालाई धार्मिक मैदानतर्फे मारबत उत्सवचे आयोजन करण्यात आले.

### स्केटिंग कोच रवींद्र मिसाळ महाराष्ट्र क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या अनुषंगाने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात



आलेल्या 'मेजर ध्यानचंद महाराष्ट्र क्रीडारत्न पुरस्कार २०२६'मध्ये उमरेडचे स्केटिंग प्रशिक्षक रवींद्र मिसाळ यांचा सन्मान करण्यात आला. राज्यातील क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावणाऱ्या खेळाडू, क्रीडा प्रशिक्षक व क्रीडा संघटकांना दरवर्षी राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून या पुरस्काराने गौरविण्यात येते. महाराष्ट्र क्रीडारत्न पुरस्कार २०२६ चा पुरस्कार वितरण सोहळा कराड, जि. सातारा येथील यशवंतराव चव्हाण स्मृती सदन टाऊन हॉल येथे उत्साहात पार पडला. यावेळी हिंदकेसरी पैलवान दिनानाथ सिंह तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव संजय शेटे यांच्या हस्ते रवींद्र मिसाळ यांना प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# विदर्भाची मायनिंग व ग्रीन स्टील हब बनण्याच्या दिशेने वाटचाल : मुख्यमंत्री फडणवीस

## पुढील २० वर्षांत खाण क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेत अर्धा ट्रिलियन डॉलरचे योगदान देणार, खाण अभियंत्यांच्या ३६व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे थाटात उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
विदर्भामध्ये मायनिंगच्या माध्यमातून भारताच्या आर्थिक विकासाचे प्रमुख इंजिन बनण्याची क्षमता असून, 'विकसित भारत @२०४७'च्या संकल्पनेत विदर्भ महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतो, त्यासोबतच गडचिरोली येथे मायनींग क्षेत्रात नवीन इको सिस्टिम तयार होत असून क्लीन ग्रीन स्टील रिवोलुशन देशात प्रथमच होत आहे असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले केले आहे.
द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) च्या नागपूर लोकल चॅप्टरतर्फे हॉटेल रॅडिसन ब्ल्यू येथे आयोजित दोनदिवसीय खाण अभियंत्यांच्या ३६व्या राष्ट्रीय अधिवेशन व 'मायनिंग फॉर विकसीत भारत @2047' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मायनिंग क्षेत्रातील नवीन संसोघन या विषयावरील प्रदर्शनीचे उद्घाटन मुख्यमंत्री यांच्या हस्ते झाले.
द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया)चे अध्यक्ष अभियंता मनीष कोठारी अध्यक्षस्थानी होते. यावेळी खनीकर्म राज्यमंत्री आशीष जयस्वाल, वेकोलीचे अध्यक्ष डॉ हेमंत शरद पांडे, डॉ सुरेश चंद्र सुमन, आयोजन समितीचे प्रमुख संदीप शिरखेडकर, अनुपम खेर , जयंत जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.





विदर्भातील विपुल खनिजसंपत्तीचा विशेषतः गडचिरोलीतील लोहखनिज साठ्यांचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, या भागात सुमारे ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि जवळपास ५० एमटीपीए (दशलक्ष टन प्रतिवर्ष) पोलाद निर्मिती क्षमता विकसित केली जात आहे. राष्ट्रीय स्तरावरील नव्या मिशनअंतर्गत प्रस्तावित पहिल्या आठ कोळसा गॅसिफिकेशन प्रकल्पांपैकी चार प्रकल्प विदर्भात आले आहेत, असेही त्यांनी सांगितले.
गडचिरोलीसोबतच चंद्रपूर, भंडारा, नागपूर, गोंदिया आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये नव्या औद्योगिक परिसंस्थेचा विकास होऊ शकतो. ग्रीन स्टील, स्वच्छ तंत्रज्ञान आणि सुधारित लॉजिस्टिक कनेक्टिव्हिटीमुळे या भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि आर्थिक संधी निर्माण होतील, असे फडणवीस म्हणाले.
आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. संदीप शिरखेडकर यांनी प्रास्ताविकात खाण क्षेत्रासमोरील गंभीर आव्हानांवर प्रकाश टाकला. महत्त्वपूर्ण खनिजे, नवे तंत्रज्ञान आणि खाणी बंद करण्याची प्रक्रिया यांसारख्या विषयांवर व्यापक चर्चा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महत्त्वपूर्ण खनिजांच्या उत्खनन व वापरासाठी सक्षम परिसंस्था उभारण्यासोबतच कौशल्य विकास केंद्रे, लवाद सुविधा आणि चाचणी केंद्रांची गरज त्यांनी व्यक्त केली.
देशभरात 'इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया)'च्या माध्यमातून ४ हजारांहून अधिक खाण अभियंत्यांचे नेटवर्क असून, त्यापैकी सुमारे ३०० अभियंते नागपुरातील आहेत. खाण विकासाच्या उपक्रमांमध्ये महाराष्ट्र सरकार आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यूसीएल) ला संस्थेतर्फे सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. अधिवेशनातील तज्ज्ञांची व्याख्याने, तांत्रिक सादरीकरणे आणि २५ स्टॉल्सच्या प्रदर्शनाची माहितीही त्यांनी दिली.
अधिवेशनाचे संयोजक डॉ. अनुपम खेर यांनी 'मायनिंग फॉर विकसीत भारत @2047' ही केवळ अधिवेशनाची संकल्पना नसून राष्ट्रीय प्रेरणा असल्याचे सांगितले. कोळसा, लोहखनिज आणि चुनखडीची वाढती मागणी पूर्ण करतानाच लिथियम, ग्रेफाइट यांसारख्या महत्त्वपूर्ण खनिजांची वाढती गरज पूर्ण करणे, तसेच तंत्रज्ञान, शाश्वतता आणि सुरक्षितता यांचा समतोल साधणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.
देशभरातून सुमारे ३०० प्रतिनिधी अधिवेशनात सहभागी झाले असून, ४० तांत्रिक संशोधन निबंध सादर करण्यात येणार आहेत. प्रगत ब्लास्टिंग तंत्रज्ञान, उतार निरीक्षण, डिजिटायझेशन, एआयचा वापर, इंटेलिजंट मायनिंग, खाण बंद प्रक्रिया, सर्क्युलर इकॉनॉमी, ऊर्जा कार्यक्षमता आणि महत्त्वपूर्ण खनिजे या विषयांवर विविध सत्रे होणार आहेत.

### खाणकाम अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि शाश्वत करण्यावर भर

मायनिंग डिव्हिजन बोर्डचे अध्यक्ष सुरेशचंद्र सुमन यांनी खनिजे ही आधुनिक उद्योग, पायाभूत सुविधा आणि भारताच्या विकासाची पायाभूत गरज असल्याचे सांगितले. एआय, ऑटोमेशन, ड्रोन, सेन्सर्स आणि रिअल-टाइम खाण निरीक्षणामुळे खाणकाम अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि शाश्वत करता येईल, असे त्यांनी नमूद केले.
खाण कामगारांची सुरक्षितता कोणत्याही उत्पादनाच्या उद्दिष्टापेक्षा अधिक महत्त्वाची आहे, असे स्पष्ट करत त्यांनी खनिज सुरक्षा ही विकसित भारताची पायाभूत गरज असल्याचे सांगितले.
डब्ल्यूसीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. हेमंत शरद पांडे यांनी नागपूरला देशाची 'मायनिंग कॅपिटल' म्हणून विकसित करण्याच्या उद्देशातून हे अधिवेशन आयोजित केल्याचे सांगितले. डब्ल्यूसीएलने १२ खाणींमध्ये १८ महत्त्वपूर्ण खनिजे आणि दुर्मीळ मृदा मूलद्रव्ये शोधून काढली असून, कोळशापलीकडे जाऊन महत्त्वपूर्ण खनिजांच्या उत्खनन व शुद्धीकरणाच्या दिशेने कंपनी विविधता आणत असल्याचे त्यांनी सांगितले.
विदर्भाला केवळ खनिजसंपन्न प्रदेश न ठेवता मूल्यवर्धित आणि उच्च उत्पन्न देणारे संसाधन केंद्र बनविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. माजरी येथे प्रस्तावित कोळसा गॅसिफिकेशन हब, 'मेक इन इंडिया', पीएलआय, 'स्टार्टअप इंडिया' आणि 'स्किल इंडिया'शी संबंधित उपक्रमांचाही त्यांनी उल्लेख केला. जलसंवर्धन, पर्यावरणीय शाश्वतता आणि इको-टुरिझमवरही डब्ल्यूसीएलचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.
इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया)चे अध्यक्ष मनीष कोठारी यांनी सर्व सदस्यांचे अभिनंदन करत संस्थेशी जोडले जाण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अशा अधिवेशनांमुळे ज्ञानाची देवाणघेवाण आणि व्यावसायिक संवादासाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध होते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसावरी गलांडे यांनी केले, यावेळी केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांच्या संदेशाचे वाचन करण्यात आले.

### यावेळी 'एमिनंट इंजिनिअर' पुरस्कारांचे वितरण

खाण अभियांत्रिकी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान पुरस्कारप्राप्तांमध्ये डॉ. हेमंत पांडे (डब्ल्यूसीएल), फ्रँकलिन जयकुमार (एसईसीएल) यांचा समावेश असून, त्यांच्या वतीने डब्ल्यूसीएलचे जीएम व पीआरओ सतीश गबले यांनी पुरस्कार स्वीकारला. श्रीपाद नाईक (एनआयआरएम) यांचाही गौरव करण्यात आला. शिक्षण आणि खाण अभियांत्रिकी क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आय. एम. मुथरेजा यांनाही सन्मानित करण्यात आले.
'यंग इंजिनिअर्स अवॉर्ड्स २०२६'ने सीएसआयआर-सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ मायनिंग अँड फ्युएल रिसर्च, धनबादचे डॉ. देबाशीष मिश्रा, एनआयटी रायपूरचे सहायक प्राध्यापक डॉ. आशीष कुमार विश्वकर्मा आणि ईस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड, पश्चिम बंगालचे व्यवस्थापक (मायनिंग) डॉ. अली मुर्तझा शेख यांचा गौरव करण्यात आला. ही परिषद फोन दिवस असून देशातील नामवंत अभियंते, अभ्यासक व सशोधक सादरीकरण करणार आहे .

## लालबहादूर शास्त्री चौकात तान्हा पोळ्याचा उत्साह, लकी ड्रॉ मधून बालगोपालांना भेटवस्तूंचे वाटप







**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड :** लालबहादूर शास्त्री चौक, उमरेड येथील हनुमान मंदिराच्या वतीने तान्हा पोळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. यावेळी परिसरातील बालगोपालांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत पारंपरिक पद्धतीने सजविलेल्या नंदीबैलांसह तान्हा पोळा साजरा केला. कार्यक्रमादरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रदीप झोडे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. बालगोपालांचा उत्साह वाढविण्यासाठी लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले. या लकी ड्रॉमधून निवड झालेल्या बालगोपालांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी संजय भांडारकर यांच्या हस्ते बालगोपालांना भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमामुळे परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पालकांसह नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून बालगोपालांचा उत्साह वाढविला. गांगापूर उमरेड येथील तान्हा पोळ्याच्या ठिकाणी अर्णवी कैलाश चावट. सावित्रीबाई फुले, भूमी धर्मेंद्र कुहीटे, फातिमा शेख यांची वेशभूषा केलेली होती. शिक्षणाचा जो खेळ चाललेला आहे त्या बाबींकडे लक्षकेंद्रित करण्यासाठी नंदी पोळा गांगापूर येथे या चिमुकल्याणी लक्ष वेधून घेतले होते.

## विविध वेशभूषेत बालगोपालांचा जल्लोष, हिरवा तलाव परिसरात उत्साहात तान्हा पोळा

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
बैल हा शेतकऱ्याचा केवळ सहकारी नसून मातीशी, शेतीशी आणि ग्रामीण संस्कृतीशी जोडलेला जिव्हाळ्याचा सखा आहे. बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची आणि लहान मुलांमध्ये आपल्या कृषी संस्कृतीची ओळख निर्माण करण्याची परंपरा जपणारा तान्हा पोळा जय जवान जय किसान गणेश उत्सव मंडळ व तेली समाज पंच कमिटी, हिरवा तलाव, मंगळवारी पेठ, उमरेड यांच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला.



तान्हा पोळ्यानिमित्त बालगोपालांनी आकर्षक पद्धतीने सजविलेल्या नंदीसह सहभाग घेतला. हनुमान, प्रभू श्रीराम, भगवान शंकर, छत्रपती शिवाजी महाराज, माँसाहेब जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांसह विविध रूपे तसेच शेतकरी वेशभूषा परिधान करून बालगोपालांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक संस्कृतीसोबत महापुरुषांच्या विचारांचा संदेश देणाऱ्या या वेशभूषेमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी सहभागी नंदींसह सर्व बालगोपालांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच चॉकलेट व बिस्किटांचे वितरण करून मुलांचा उत्साह वाढविण्यात आला.
याप्रसंगी पत्रकार मनिष शिंगणे यांनी तान्हा पोळ्याच्या शुभेच्छा देत, तान्हा पोळा हा केवळ मुलांचा उत्सव नसून शेतकरी, बैल आणि शेती संस्कृतीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा संस्कार आहे. आजच्या पिढीला आपल्या मातीतल्या परंपरांची आणि शेतकऱ्याच्या कष्टांची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे, असे सांगितले. तान्हा पोळ्याचे अध्यक्ष गजानन झाडे, माजी सभापती, शेतकी खरेदी-विक्री संघ, उमरेड यांनी मार्गदर्शन केले. नगरसेवक विशाल देशमुख यांनीही उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.
कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. पंच कमिटीचे अध्यक्ष गोलू किसन चकोले, उपाध्यक्ष मोरेश्वर झाडे, सचिव गजानन झाडे यांच्यासह रणधीर झाडे, रघुनाथ झाडे, प्रभाकर झाडे, गोपीचंद झाडे, सूरज यादव, ज्ञानेश्वर झाडे, प्रकाश झाडे, विलास चंदनखेडे, सौरभ झाडे, अनुप झाडे, अक्षय झाडे, सूरज चव्हाण, परेश चव्हाण, नरेश झाडे, लोकेश झाडे, मधुकर झाडे आदींनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले. बैलाच्या श्रमांची जाणीव, शेतकऱ्याच्या कष्टांचा सन्मान आणि पुढील पिढीला संस्कृतीची ओळखऱ्या त्रिसूत्रीचा सुंदर संगम तान्हा पोळ्याच्या माध्यमातून उमरेडमध्ये अनुभवायला मिळाला.

# नागपूर येथे जिल्हा न्यायालयासाठी आधुनिक व सुसज्ज इमारत उभारणार : मुख्यमंत्री

## जिल्हा वकील संघटनेच्या नवीन कार्यकारिणीचे पदग्रहण उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
येथील न्यायविषयक कामकाजाची वाढती व्याप्ती पाहता येथील जिल्हा न्यायालयासाठी लवकरच प्रशस्त जागेत आधुनिक व सुसज्ज इमारतीची निर्मिती करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली. न्यायव्यवस्थेतील घटकांनी वंचित-आकांक्षित समुहाशी बांधिलकी जोपासण्याचे आवाहनही त्यांनी केले.
नागपूर येथील जिल्हा वकील संघटनेचा पदग्रहण सोहळा आज सायंकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत व भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल किलोर, विधी व न्याय राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, नागपूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एस. आझमी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश जायसवाल, सचिव अनिल गुल्हाने, संघटनेचे माजी अध्यक्ष रोशन बागडे, माजी सचिव मनिष रणदिवे आदी यावेळी उपस्थित होते.
जिल्हा वकील संघटनेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीला शुभेच्छा देऊन फडणवीस म्हणाले, न्यायव्यवस्थेत आमुलाग्र बदल झाला असून तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. या बदलत्या परिस्थितीमध्ये सर्वसामान्यांचा न्यायदानाच्या प्रक्रियेवरील विश्वास दृढ करण्याचा व वेगाने न्याय मिळावा ही सामान्यांची अपेक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने प्रयत्न करण्याची गरज आहे. नागपूरच्या बार असोसिएशनचीच परंपरा अतिशय गौरवशाली आहे, असे ते म्हणाले.
भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांचा गौरव करून फडणवीस म्हणाले, त्यांनी गोरगरीब व गरजूंना केलेली मदत आपण पाहिली आहे. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी कायम इतरांना मदत व सहकार्य केले असून त्यांचा हा आदर्श न्यायदानाच्या प्रक्रियेतील सर्व सक्रीय घटकांनी डोळ्यासमोर ठेवावा आणि समाजातील वंचित, आकांक्षित घटकांसाठी काम करण्यासाठी प्रयत्न करावा.
कायदा, न्यायव्यवस्था आणि वकील संघाच्या भूमिकेवर विशेष भर देत माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई म्हणाले, ज्यूडीशियल इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये महाराष्ट्र अग्रेसर असून मागील काही वर्षात याबाबत भरीव काम झाले आहे. विधी विद्यापीठ, कोल्हापूर खंडपीठाच्या निर्मितीसह विविध महत्त्वाची कामे मार्गे लागली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी निधीची कमतरता भासू दिलेली नाही. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन अनेक कामे मार्गे लावली आहेत. त्यांच्या सहकार्यामुळे विधी क्षेत्राचा विकास होत असून वकिलांनी सामाजिक क्षेत्रातही आपला ठसा उमटवावा असे त्यांनी सांगितले.





नागपूरच्या बार असोसिएशनची दीडशे वर्षांची परंपरा अतिशय गौरवशाली असून सामाजिक जाणिव आणि बांधिलकी जपणाऱ्या वकिलांच्या जडणघडणीसाठी बार असोसिएशनने पुढाकार घ्यावा, असे आवाहन न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी यावेळी केले. वकिली हा व्यवसाय नसून ते सामाजिक कार्य आहे. चार भिंतींच्या बाहेर जाऊन समाजाचा शेवटच्या व्यक्तीपर्यंत जोडले जाण्यासाठी या व्यवस्थेतील सर्व घटकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.
नुतन कार्यकारणीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश जायसवाल, नागपूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एस. आझमी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. रोशन बागडे यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यावेळी नागपूर बार असोसिएशनचे सदस्यत्व बहाल करण्यात आले.
जिल्हा वकील संघटनेच्या नव्या कार्यकारणीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश एस. जायसवाल आणि सचिव ॲड. अनिल गुल्हाने यांच्यासह उपाध्यक्ष ॲड. विकास करहाडे व ॲड. वैशाली बगाडे, सहसचिव ॲड. पंकज राजवाडे व ॲड. रुबी सिंग, कोषाध्यक्ष ॲड. प्रीती पिंपळकर आणि ग्रंथालय प्रमुख ॲड. सौरभ राऊत यांनी तसेच सर्व सदस्य ॲड. रोहित रामटेके, ॲड. सुशांत पाटील, ॲड. इन्दरदीप सिंग कलसी, ॲड. अमेय फुंडे, ॲड. मंगेश लाढे, ॲड. नवज्योत सोनी तसेच महिला राखीव प्रतिनिधी म्हणून ॲड. पूजा शर्मा, ॲड. स्नेहा पेटकर व ॲड. मेघना बोबडे यांनी पदग्रहण केले. जिल्हा वकील संघाच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीला उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी विधी तज्ज्ञ, वकील, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

दैनिक सिंहवाणी वृत्त


थोडक्यात

## श्री लक्ष्मीनारायण देवस्थान शिव मंदिर सेवा समिती, नंदनवनतर्फे "तान्हापोळा-२०२६"उत्साहात




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्थानिक श्रीगुरुदेव चौक,नंदनवन कॉलनी येथे श्रीलक्ष्मीनारायण देवस्थान शिवमंदिर सेवा समितीद्वारा "तान्हापोळा-२०२६"मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. पोळा पाटील नामदेवराव देवतारे गुरुजी यांचे अध्यक्षतेखाली आणि दिव्याताई धुरडे, (सभापती-जलप्रदाय समिती,मनपा), नगरसेवक प्रवीण गिर्हे, रजनीताई वानखेडे, गणेश चर्लेवार, माजी मनपा विरोधी पक्षनेता तानाजी वनवे,देवस्थान समितीअध्यक्ष इंजि. गिरीश मानापुरे,अस्थिरोगतज्ञ डॉ. सय्यद जाफरी, सल्लागार सतीश कुकडेआदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवस्थान समितीचे महासचिव व नगरसेवक ॲड.डॉ.निलेश गायधने यांनी केले. नंदनवन पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांनी "ऑपरेशन थंडर-नशा मुक्त नागपूर" याविषयी माहिती दिली. याप्रसंगी स्व.दुर्गाबाई रामभाऊ लुंगे स्मृती बालपुरस्कार निर्धार गुहे (४ महिने) आणि आहाना पराये (२१ महिने) या सुदृढ बालक-बालिका यांना देण्यात आला. प्रथम(रु.२५०१/-), द्वितीय (रु.२००१/-) आणि तृतीय (रु.१५०२/-) क्रमांकाचे पारितोषिक 'अ'गट(०-३वर्ष) हितांश नगरनाईक,श्रद्धा आकरे, विद्या जोहरापूरकर/'ब'गट(३ते६वर्ष)क्रियान बेलोकर,प्रफुल येरपुडे,अरहम खेडकर आणि 'क'गट(६ वर्षावरील)रिया घोडमारे,गोपाल घोडमारे, अग्रता चौरे यांना स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.

आकर्षक वेशभूषा, बैल सजावट, सुदृढ आरोग्य परिक्षण डॉ.शाहिद जाफरी, इंजि.प्रकाश वैष्णव, अर्चना कापसे, मनीषा तांबुलकर यांनी केले. या अभिनव कार्यक्रमाचे संचालन लॉ. डॉ. शांतिदास लुंगे, अध्यक्ष-लॉयन्स क्लब नागपूर सेवन स्टार यांनी तर आभार प्रदर्शन समिती सदस्य हेमंत आकरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी विश्वास सेलसुलकर, प्रकाश गायधने, डॉ. सचिन गभणे,अजय देवगडे, दिनेश मेहर, प्रवीण निखाडे, डॉ.राहुल पेठे, हर्षद कोहळे, डॉ.जयंत गायकी, राम कडू, विजय देवगडे, ॲड.दिपक गादेवार, संजय पराये, शार्दुल लुंगे, रोशनी मेहर, ॲड.सोनाली गायधने, लॉ.सौदामिनी लुंगे, मृणाल गभने, आरती आकरे, जागृती आठवले यांनी अथक परिश्रम घेतलेत. याप्रसंगी जेष्ठ नागरिक,पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## परसोडी येथे पारंपरिक बैल पोळ्याचे आयोजन २० जोड्यांना पारितोषिके वितरण



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

पोळ्या निमित्ताने परसोडी (राऊत) येथे पारंपरिक स्व. बाबुराव गंगाराम पाटील राऊत, यांच्या स्मरणार्थ, सालाबादप्रमाणे गुरुवारला भव्य आयोजन करण्यात आले. याप्रसंगी २० बैलजोडीना भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला अशोकजी राऊत माजी सरपंच येरला,प्रतिष्ठित तथा सामाजिक कार्यकर्ते विनोद राऊत, शिवाजी राऊत, राजेंद्र. तेजराव राऊत, जगदीश राऊत, यशवंतराव राऊत माजी पोलीस पाटील, दयाल राऊत, अजय राऊत, प्रकाश पाबळे अन्य मान्यवर मंडळी उपस्थित होती. शेतकरी व उपस्थितांनी पोळ्याचा आनंद घेतला.

# नागपुरात ओयो आणि हॉटेल्ससाठी 'ऑपरेशन शक्ती' अंतर्गत कडक नियम

### नियमांचे उल्लंघन केल्यास थेट गुन्हा दाखल होणार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार पोलीस आयुक्तांनी केले निर्देश जारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील OYO, हॉटेल्स, लॉज, गेस्ट हाऊस आणि होम-स्टेमध्ये बेकायदेशीर घडामोडींना आळा घालण्यासाठी नागपूर पोलीस आयुक्तालयाकडून 'ऑपरेशन शक्ती' राबविण्यात येत असून, आता जारी झालेल्या नव्या अधिसूचनेनुसार मानवी तस्करी बेकायदेशीर देहविक्री आणि फसवणुकीच्या घटना रोखण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार नागपूर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी अधिसूचना जारी केली आहे. आज, सप्टेंबर २०२६ ते ९ नोव्हेंबर २०२६ या कालावधीसाठी हे नियम लागू राहतील. या अधिसूचनेतील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल, लॉज व गेस्ट हाऊस मालक/ व्यवस्थापकांवर कायदेशीर गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा पोलीस आयुक्तांनी दिला आहे.

**ऑपरेशन शक्तीअंतर्गत प्रमुख मार्गदर्शक नियम असे**



झिरो टॉलरेंस बोर्ड अनिवार्य : प्रत्येक ड ड व हॉटेलच्या मुख्य भागात 'मानवी तस्करी आणि बेकायदेशीर कामांना थारा दिला जाणार नाही' अशा आशयाचा 'झिरो टॉलरेंस'चा स्पष्ट व ठळक बोर्ड लावणे अनिवार्य करण्यात आले आहे.

कडक ओळख पडताळणीः ग्राहकांना खोली देण्यापूर्वी त्यांचे मूळ ओळखपत्र (पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स इ.) तपासून संपूर्ण माहिती रजिस्टर किंवा डिजिटल प्रणालीमध्ये नोंदवणे बंधनकारक आहे. ओळखपत्रावर जन्मदिनांक व स्थायी पत्ता असणे आवश्यक आहे. (पॅन कार्ड सामान्यतः स्वीकारले जाणार नाही).

अविवाहित जोडप्यांसाठी नियम : दोन्ही व्यक्ती सज्ञान (१८ वर्षे किंवा त्याहून अधिक) असल्यास संमतीने हॉटेलमध्ये राहणे कायदेशीर आहे, मात्र त्यांची वयाची व निवासाची कडक शहानिशा करून रजिस्टरमध्ये नोंद घेणे अनिवार्य असेल.

सीसीटीव्ही देखरेख व १ वर्षाचा बॅकअप : हॉटेलच्या प्रवेशद्वारापासून लॉबीपर्यंत २४ तास सीसीटीव्ही सुरू असावेत व त्याचा फुटेज रेकॉर्ड किमान १ वर्षाचा असावा. कॅमेरे नादुरुस्त असल्यास त्वरित दुरुस्त करणे बंधनकारक आहे.

अल्पवयीन व्यक्तींबाबत नियम : अल्पवयीन व्यक्तींच्या बाबतीत कडक पडताळणी केली जाईल आणि पालक सोबत असल्याशिवाय त्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

कर्मचाऱ्यांची माहिती : हॉटेल्समधील सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची ओळखपत्रे, रहिवासी दाखले व फोन नंबरची अद्ययावत फाईल मालकांकडे असणे आवश्यक आहे.

बोगस ब्रँडिंगवर कारवाई : नागपूर पोलीस आणि ड ड कंपनीने संयुक्त कारवाई करून अनधिकृतपणे 'OYO' चे नाव वापरणाऱ्या २० पेक्षा जास्त हॉटेल्सचे साईनबोर्ड हटवले असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# एनर्जी लिडरशिप परिषदेत अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र यांना 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'

### महावितरणला 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी' पुरस्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

ऊर्जा परिवर्तनाची प्रभावी अंमलबजावणी, सौर ऊर्जेद्वारे शेतीला दिवसा वीज तसेच ग्रामीण अर्थकारणाला बळ, गुंतवणूक व रोजगार संधी, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक शिस्त आदींच्या माध्यमातून महावितरणने देशाच्या वीज क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या नेतृत्वासाठी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'ने तसेच वीज मागणीच्या अचूक अंदाजासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी तंत्रज्ञानासाठी महावितरणचा 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी अवॉर्ड'ने गुरुवारी (दि. १०) गौरव करण्यात आला.

भारताच्या वाढत्या ऊर्जा गरजा आणि भविष्यातील दिशा यावर मंथन करण्यासाठी '६ व्या ईटी एनर्जी लीडरशिप समिट २०२६' चे नवी दिल्ली येथे आयोजन करण्यात आले. या दोन दिवसीय परिषदेत ऊर्जा क्षेत्रातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्र व विविध राज्य सरकारचे तसेच वीज क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे प्रमुख, गुंतवणूकदार आणि तंत्रज्ञान पुरवठादार आदींची उपस्थिती होती. यावेळी लोकेश चंद्र यांनी प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्रातील सौर ऊर्जेच्या माध्यमातून बदलणारे ग्रामीण अर्थकारण, गुंतवणूक, रोजगार, शेतीसाठी दिवसा वीज आणि इतर सकारात्मक बदलांची माहिती दिली.



या परिषदेत सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान यांच्याहस्ते अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर महावितरणचा पुरस्कार लोकेश चंद्र यांच्यासह कार्यकारी संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता संतोष सांगळे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) भूषण कुलकर्णी यांनी स्वीकारला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र यांचे तसेच महावितरणच्या सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी महावितरणचा चेहरामोहरा बदलला आहे. ऊर्जा परिवर्तनामुळे महावितरणच्या वीजदरात प्रथमच कपात करण्यात आली असून येत्या वर्षांत ते आणखी कमी होत जाणार आहे. जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे आतापर्यंत ६२५० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प पूर्ण झाले असून १७ लाख ५२ हजारांवर शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे.

यासोबतच पीएम कुसुम-बी अंतर्गत देशात आजमितीस १७ लाख ४२ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात तब्बल ६५ टक्के म्हणजे ११ लाख ५४ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. पीएम सूर्यघर योजनेसाठी महावितरणला केंद्र शासनाचे नुकतेच आठ पुरस्कार मिळाले असून राज्यात आतापर्यंत ७ लाख ७७ हजार ५१६ घरांवर २९४७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहे. महावितरणने वीज मागणीच्या अचूक अंदाजासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्निंग तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरु केला आहे.

यासाठी विकसित केलेल्या एआय/एमएल-ड्रिव्हन डिमांड फोरकास्टिंग इंजिन या तंत्रज्ञानाच्या कामगिरीची दखल घेत महावितरणला 'ॲडॉप्टिंग एआय इन एनर्जी अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले. महावितरणने १२ सप्टेंबर २०२४ पासून हे 'एआय'चे स्वयंचलित तंत्रज्ञान पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केले आहे. या तंत्रज्ञानामुळे वीज खरेदी खर्च, मागणी-पुरवठ्यातील तफावत, ग्रीड स्थैर्य, थेट आर्थिक नियोजन आदींमध्ये मोठे यश मिळवले आहे आणि आतापर्यंत वीज खरेदीमध्ये तब्बल १२०० कोटी रुपयांची बचत झाली आहे.

## मुकप्राण्यांचा सन्मान करणारी आमची संस्कृती म्हणजेच पोळा: डॉ. आशिष देशमुख

### सावनेर येथे बैलपोळा उत्सव उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

शेतकरी आणि सर्जा-राजाच्या अतूट नात्याचे प्रतीक असलेला पारंपरिक 'बैलपोळा उत्सव' माताखेडी येथील पोळा मैदानावर उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शंभरच्या वर शेतकरी बांधवांनी आपल्या बैलांना आकर्षक पद्धतीने सजवून पूजा-अर्चा करत पोळा मैदानात आणले. आमदार आशिषबाबू देशमुख यांनी बैलजोडी घेऊन उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे अंगवस्त्र व बोजारा देत सन्मानित केले. कार्यक्रमास सावनेर मतदारसंघाचे आ. डॉ. आशिष देशमुख, भाजपा नेते रामराव मोवाडे, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक मंदार मंगळे, डॉ. विजय धोटे यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. प्रास्ताविक मंदार मंगळे यांनी केले. आ. डॉ. आशिष देशमुख यांनी पारंपरिक सण व ग्रामीण संस्कृतीचे जतन करण्याचे आवाहन करत म्हटले की मुकप्राण्यांचा सन्मान करणारी संस्कृती म्हणजे पोळा, पोळा हा नुसता सन नसुन वर्षभर आपल्या खांद्याला खांदा भिडवून शेतात मशागत करणाऱ्या सर्जा राज्याच्या प्रती आपल्या कुतज्ञता व्यक्त करण्याचा सण आहे.आज शेतकरी बंधव अनेक संकटाला तोंड देत आपले जिवनव्यापन करत आहे.यावर निसर्ग ही कोपला आहे.अश्यात खचून न जाता धयार्ने या कठीण परिस्थितीचा सामना आपणास करावा लागणार असल्याचे मत व्यक्त करत. एक आमदार या नात्याने मी सदैव आपल्या सुखा दुखाःत नेहमीच आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील अशी ग्वाही याप्रसंगी देत शेतकरी बांधवांना बैलपोळ्याच्या शुभेच्छा दिल्या.

भारतीय जनता पक्षाचे शहर अध्यक्ष मंदार मंगळे यांनी आपल्या प्रास्ताविकात सावनेर नगरीत होत असलेले नवनिर्माण तसेच विविध प्रकल्पाची माहीती देत म्हटले की, मागीतली अनेक वषार्पासून रखडलेल्या कामांना आता सुरू झाली आहे अनेक कार्य पुर्ण झाले आहे आणी काही कामे प्रगती पथावर आहेत.मग शहरातील सांडपाणी वाहून भुमीगत नेणार्या नाल्या, प्रत्येक घराला योग्य स्वच्छ पेयजल आपुर्ती, घरकुल योजना, पट्टे वाटप, स्वच्छता आदी कार्यांना प्राथमिकता देण्यात येत आहे. याकरिता मा.आमदार साहेब नगर पालीकेला निधीची कमतरता पडू देत नाही. सावनेर शहराचे नवनिर्माण करण्यासाठी आम्ही दिवरात्र झटत असल्याचे याप्रसंगी बोलून दाखविले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाजप शहर अध्यक्ष मंदार मंगळे, न.प. उपाध्यक्ष राजू घुगल, गटनेते रवींद्र ठाकूर, डॉ. विजय धोटे,अशोक उमाठे, नीलेश पटे, महेश चकोले, अरविंद ताजने, कुलभूषण नवधिंगे,आदींसह नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकत्यांनी परिश्रम घेतले. आयोजनाचे संचालन पवन सातपुते यांनी केले.

# रस्ते अपघातात युवकाचा मृत्यू, तीन तास मृतदेह रस्त्यावर ठेवून गावकऱ्यांनी नोंदवला विरोध



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तालुक्यातील केळवद पोलीस स्टेशन अंतर्गत च्या जैतापुर गावातील युवकाचा रस्ते अपघातात युवकाच्या दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उडकीस आल्याने एकच खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार विकास कांताराम घुगल वय २२ रा. चा सकाळी ८ च्या दरम्यान मोटर सायकल क्र एमएच-३१ व्ही ५७६३ वर जात असताना वाहन स्लीप होऊन दुर्दैवी मुत्यू झाल्याची माहीती मीळताच हितज्योती आधार फाऊंडेशनचे हितेश बनसोड यांनी घटनास्थळी धाव घेतली. सदर घटनेची माहिती केळवद पोलीस स्टेशनचे ठाणेदार आशिषसिंग ठाकूर यांना दीली

विस्तृत माहिती नुसार जैतपूर गावाला हायवेपासून जोडणारा अवघा दीड किलोमीटरचा रस्ता गेल्या कित्येक वर्षांपासून खराब अवस्थेत आहे. काही दिवसांपूर्वी या रस्त्याचे थोडेफार काम करण्यात आले; मात्र काम अद्याप अपूर्ण असून रस्त्याची अवस्था अत्यंत धोकादायक आहे.

आज याच खराब आणि अपूर्ण रस्त्यामुळे अवघ्या २२ वर्षांच्या जवान मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. एका कुटुंबाने आपला मुलगा गमावला असल्याचा आरोप गावकरी करत आहेत. व सदर अपघाताला हाच अपुर्ण रस्ता असल्याचे बोलल्या जात आहे. व गावकरी संबंधित विभाग व प्रशासनास प्रश्न विचारत आहेत की आजपर्यंतचा हा रस्ता पूर्ण कधी होणार, याचे उत्तर प्रशासनाकडून का दिले जात नाही..?, रस्त्याचे काम सुरू करून ते अर्धवट का सोडण्यात आले...कामाचा दर्जा एवढा अपूर्ण आणि निष्काळजीपणाचा का आहे...?

**संतप्त गावकऱ्यांचा रस्तारोको**

या घटनेच्या निषेधार्थ समस्त गावकऱ्यांकडून घटनास्थळी रस्ता रोको आंदोलन सुरू आहे. जोपर्यंत प्रशासन घटनास्थळी येऊन रस्त्याच्या कामाबाबत ठोस आश्वासन देत नाही आणि रस्ता पूर्ण करण्याची स्पष्ट भूमिका घेत नाही, तोपर्यंत मृतदेह उचलू देणार नाही, अशी गावकऱ्यांची भूमिका आखत आज आमच्या २२ वर्षांच्या विकास जवान मुलाचा सकाळी ८ जीव गेला आहे; उद्या आणखी कोणाचा जीव जाण्याची वाट प्रशासन पाहत आहे का..? हा केवळ रस्त्याचा प्रश्न नाही, हा प्रत्येक गावकऱ्याच्या जीविताचा प्रश्न आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन रस्त्याचे काम पूर्ण करावे आणि या दुर्घटनेची जबाबदारी निश्चित करावी. अशी मागणी धरुण ठेवत जवळपास तीन तास रस्त्यावर ठाण मांडले.

घटनेची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खर्डे केळवद पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी आशिषसिंग ठाकूर यांनी पोलीसांच्या मोठ्या ताफ्यासह पोहचुन गावकऱ्यांची समजुत घालण्याचे प्रयत्न करत स्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न केले असता गावकऱ्यांनी सदर मार्ग निर्माण विभागास दोषी ठरवत संबंधीतांवर योग्य कारवाई, मृतकाच्या परिवारास तात्काळ योग्य मोबदला व सदर रस्ता तात्काळ निर्माण करावा अशी तीव्र मागणी धरून ठेवत जवळपास तीन तास ठाण मांडले. उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खर्डे यांनी संतप्त गावकऱ्यांची समजुत काढत मुतदेह घटनास्थळावरून हलविण्याची विनंती केली व मृतदेह शवविच्छेदनासाठी प्राथमिक आरोग्य प्रशिक्षण केंद्र सावनेर येथे रवाना केले.

**दैनिक सिंहवाणी वृत्त**

आपल्या बातम्या दैनिक सिंहवाणी वृत्तच्या मेलवरच पाठवाव्या. इतरत्र कुणालाही व्हॉट्सअप करू नये.

- संपादक

# मारबत महोत्सवानिमित्त छायाचित्र स्पर्धेचे निकाल घोषित

## अनिरुद्ध सिंग दिनोरे अव्वल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मारबत महोत्सवाच्या अनुषंगाने शहरातील प्राचीन, पारंपरिक व सांस्कृतिक ओळख असलेल्या मारबतीच्या जनजागृतीसाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने व ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लबच्या साहाय्याने छायाचित्र प्रदर्शन व छायाचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या छायाचित्र स्पर्धेच्या निकालाची घोषणा करण्यात आली असून, यात अनिरुद्ध सिंग दिनोरे हे प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरले.

ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लबचे अध्यक्ष महेश काळबांडे, ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लबचे सचिव नरेश नेरकर, ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स क्लबचे कोषाध्यक्ष नितेश बाहे तसेच कलुबचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनपाद्वारे आयोजित प्रदर्शनाला नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला. नागरिकांनी विविध सुंदर छायाचित्रांचा डोळे भरून आनंद घेतला. मारबत समयीचे विविध दृश्य, जनतेच्या उत्साहात मारबतीचे आगमन ते मारबतीला दहन करण्यापर्यंतचे निरनिराळे क्षण, यावेळी स्थानिक संस्कृतीतील प्रात्यक्षिकांचे असे अनेक कलात्मक आणि नाविन्यपूर्ण छायाचित्रांनी भरलेल्या प्रदर्शनाला बघण्याचा आनंद घेतला. विशेष म्हणजे, जुन्या काळापासून तर मागील वर्षीच्या मारबत उत्सवातील क्षणापर्यंत अनेक छायाचित्र विविध छायाचित्रकारांच्या माध्यमातून टिपून प्रदर्शनीत निवडण्यात आले होते. सोबतच छायाचित्र स्पर्धेचा निकाल घोषित करण्यात आला. अनिरुद्ध सिंग दिनोरे हे प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरले. द्वितीय पुरस्कार राहुल मिश्रा, तृतीय पुरस्कार युगल सावरकर, प्रथम उत्तेजनार्थ स्नेहल सोनटक्के, तर द्वितीय उत्तेजनार्थ पुरस्कार देवांशु उकळे यांना मिळाला. स्पर्धेचे परीक्षण छायाचित्रकार नाना मिसाळ व छायाचित्रकार विनोद राऊत यांनी केले.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शनिवार, १२ सप्टेंबर २०२६

थोडक्यात

## आश्रमशाळांतील अन्नधान्याची तपासणी करा, दोषींवर कठोर कारवाई करा!

**निकृष्ट अन्नामुळे आदिवासी विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात; नंदुभाऊ नरोटे यांची अन्न व औषध प्रशासनाकडे मागणी**



**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

महाराष्ट्रातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या अन्नधान्याची तत्काळ तपासणी करून निकृष्ट अन्नधान्य पुरविणाऱ्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सरसेनापती नंदुभाऊ नरोटे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाकडे निवेदन सादर केले आहे. राज्यातील आश्रमशाळांमध्ये पुरविण्यात येणारे अन्नधान्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून ते विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी धोकादायक असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. तसेच काही आश्रमशाळांमध्ये शुद्ध पाण्याचीही व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

निवेदनानुसार, राज्यातील ५८४ शासकीय आश्रमशाळांना अन्नधान्याचा पुरवठा केंद्रीय भंडार, मुंबईमार्फत पेटी कंत्राटदारांच्या माध्यमातून केला जातो. तर जवळपास ५९० अनुदानित आश्रमशाळांमध्ये संस्थाचालकांकडून अन्नधान्याचा पुरवठा केला जात असल्याचे सांगण्यात आले आहे. या सर्व आश्रमशाळांमधील अन्नधान्याची अन्न व औषध प्रशासन विभागाने प्रत्यक्ष तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित हा गंभीर विषय असून, अन्नधान्याचे नमुने तपासून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नंदुभाऊ नरोटे यांनी केली. यासंदर्भातील निवेदन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ आणि विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांना देण्यात आले आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. यावेळी विलास नरोटे, जिल्हाध्यक्ष, मोहन पुराम, ज्योती पेंदाम, महिला जिल्हा अध्यक्ष, बाळासाहेब ठाकरे-वडसा, विलास कन्नाके यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## आमगाव, गणेशपूर व पदमपूर येथे बैलपोळा उत्साहात साजरा

**जमीनदार वाड्यातून बैलजोड्यांची मिरवणूक, पावर हाऊस येथील आखरावर सामूहिक पूजन**



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

शेतकरी आणि बैल यांच्यातील अतूट नाते जपणारा पारंपरिक बैलपोळा सण आमगाव, गणेशपूर व पदमपूर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने बैलजोड्यांना आकर्षक सजावट करून पारंपरिक पद्धतीने त्यांची पूजा-अर्चा करण्यात आली. आमगाव शहरातील बैलपोळ्याची विशेष परंपरा असून, जमीनदार वाडा येथून सजवलेल्या बैलजोड्यांसह पोळ्याची मिरवणूक काढण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गावरून ही मिरवणूक पावर हाऊस येथील आखरावर पोहोचली. त्यानंतर शहरातील विविध भागांतील सर्व बैलजोड्या एकत्र आल्या.

जमीनदार देवकांत बहेकार आणि पोलीस पाटील नर्मदा चुटे यांच्या हस्ते बैलजोड्यांचे विधिवत पूजन व पूजा-अर्चा करण्यात आली. यावेळी अभय ढेंगे, संतोष श्रीखंडे, सचिन ढेंगे, राजेश शिवणकर, धनलाल मेंढे, पुष्पकांत बहेकार, राधेश्याम कारंजेकर, प्रेमलाल तलमले तसेच गावकरी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने बैलपोळा साजरा करताना नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. गणेशपूर व पदमपूर येथेही शेतकऱ्यांनी आपल्या बैलजोड्यांची सजावट करून त्यांची पूजा केली. वर्षभर शेतकऱ्यांसोबत शेतीच्या कामात मेहनत करणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची ही परंपरा ग्रामीण भागात आजही मोठ्या श्रद्धेने जपली जात आहे. बैलपोळ्यानिमित्त आमगाव परिसरात दिवसभर उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

## इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्या वतीने विद्यार्थ्यांना ई-लर्निंग कार्डचे वाटप




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूर, डिस्ट्रिक्ट ३०३च्या अध्यक्षा पूजा सावजी यांच्या नेतृत्वाखाली भिडे हायस्कूल, नागपूर येथील इयत्ता १०वीच्या ६५ विद्यार्थ्यांना ई-लर्निंग कार्डचे वाटप करण्यात आले. प्रत्येक कार्डची किंमत १,५०० आहे. विद्यार्थ्यांना अतिरिक्त डिजिटल शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या परीक्षेच्या तयारीला मदत करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. विशेषतः महागड्या खासगी शिकवणीचा खर्च परवडत नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.

भिडे हायस्कूलच्या मुख्याध्यापिका गडकरी यांनी इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्या या शैक्षणिक उपक्रमाचे कौतुक केले. ई-लर्निंग कार्ड मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला आणि या सुविधेमुळे आपल्या अभ्यासात नक्कीच मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. या प्रकल्पासाठी डॉ. विजया खांजोडे यांनी प्रायोजकत्व दिले. क्लबच्या पाच सदस्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन सहकार्य केले.

# गाव छोटे, पण संस्कारांची उंची मोठी! बोरी (घिवारीत) तान्हा पोळ्यानिमित्त चिमुकल्यांसाठी अनोखा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू-मौदा**

गाव लहान असले तरी इच्छाशक्ती मोठी असेल, तर विकासासोबतच संस्कार आणि संस्कृती जपणारे सुंदर उपक्रमही घडू शकतात, याचा प्रत्यय गट ग्रामपंचायत बोरी (घिवारी) येथे तान्हा पोळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अनोख्या उपक्रमातून आला.

गावातील चिमुकल्यांना आपल्या परंपरा, संस्कृती, बैलांप्रती असलेले प्रेम आणि शेतकरी बांधवांच्या कष्टांची जाणीव व्हावी, या उद्देशाने सरपंच विशाल मदन सेलोकर यांच्या पुढाकारातून तान्हा पोळ्याचे



आयोजन करण्यात आले. यावेळी चिमुकल्यांसाठी नंदी सजावट व पारंपरिक वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली.

विशेष म्हणजे सहभागी झालेल्या प्रत्येक बालगोपालाला प्रोत्साहन म्हणून टिफिन बॉक्सचे वाटप करण्यात आले. उत्कृष्ट नंदी सजावट व आकर्षक वेशभूषा करणाऱ्या चिमुकल्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. चिमुकल्यांनी पारंपरिक वेशभूषेत आणि सुंदर सजविलेल्या नंदींसह मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पालकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाला नायब तहसीलदार अनिल भगत, अरोली पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार सागर गोमासे, भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, कोदामेंढीचे उपसरपंच गोपाल गिरमेकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक, वडीलधारी मंडळी, शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी चिमुकल्यांचे कौतुक करत पारंपरिक सणांमधून पुढच्या पिढीला आपल्या संस्कृतीची आणि शेतकऱ्यांच्या जीवनाची ओळख करून देणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

सरपंच विशाल सेलोकर यांच्या पुढाकारातून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे ग्रामस्थांनी कौतुक केले. 'फक्त विकासकामे करणे नव्हे, तर गावातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन संस्कार, शिक्षण, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी जपणे हेही ग्रामविकासाचे महत्त्वाचे अंग आहे,' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. छोटे गाव, मर्यादित साधने; मात्र मोठी स्वप्ने आणि त्याहून मोठी इच्छाशक्ती या विचारातून बोरी गावाने तान्हा पोळ्याच्या निमित्ताने एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

उपक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविणाऱ्या प्रमुख पाहुण्यांचे तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ, पालक आणि सहभागी बालगोपालांचे सरपंच विशाल सेलोकर यांनी मनःपूर्वक आभार मानले.

# ढोल-ताशांच्या गजरात मेंढल्यात रंगला तान्हा पोळा!

**परंपरेच्या ४६व्या वर्षात चिमुकल्यांच्या नंदीबैलांचा उत्साह, मंगलाष्टकांनी लावले नंदीबैलांचे लग्न, प्रत्येकाला आकर्षक बक्षिसांची मेजवानी**

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील मेंढला येथील मैदान चौकात वर्षानुवर्षांची परंपरा जपत यंदाचा ४६वा तान्हा पोळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शुक्रवारी दुपारी ४ वाजता भरलेल्या या तान्हा पोळ्यात चिमुकल्यांनी आकर्षक पद्धतीने सजवून आणलेल्या नंदीबैलांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

दरवर्षीच्या परंपरेनुसार तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष योगेश जेवडे यांच्या घरून गुढी काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात वाजतगाजत ही गुढी चिमुकल्यांच्या नंदीबैलांसह गावातील मुख्य हनुमान मंदिरात नेण्यात आली. यावेळी बालगोपालांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मैदान चौकात तान्हा पोळ्यानिमित्त आंब्याच्या पानांचे आकर्षक तोरण तसेच रंगीत पताका लावून परिसराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण मैदान चौकाला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. चिमुकल्यांनी विविध रंगांनी सजवलेले नंदीबैल घेऊन उत्साहात सहभाग नोंदविला. तान्हा पोळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक नंदीबैलाला



तनिष टूर्स अँड टेव्लसचे संचालक विनोद घाटोळे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष योगेश जेवडे तसेच मित्र परिवार मेंढला ग्रुप यांच्या वतीने आकर्षक बक्षिसे देण्यात आली. त्यामुळे चिमुकल्यांचा उत्साह आणखी द्विगुणित झाला.

यानंतर विधीपंडितांच्या मंत्रोच्चारात नंदीबैलांची विधिवत पूजा-अर्चना करण्यात आली. पारंपरिक पद्धतीने मंगलाष्टके म्हणत नंदीबैलांचे लग्न लावण्यात आले. या सोहळ्याला उपस्थित ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी चिमुकल्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

लहान मुलांमध्ये शेती, बैल आणि ग्रामीण संस्कृतीशी असलेली नाळ कायम राहावी, तसेच पारंपरिक सण-उत्सवांची संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले. ४६ वर्षांची परंपरा जपत मेंढल्यातील तान्हा पोळा यंदाही उत्साह, आनंद आणि पारंपरिक संस्कृतीच्या दर्शनाने अविस्मरणीय ठरला.

# अनधिकृत बांधकामप्रकरणी नगरसेविका शिल्पा हेमके यांचे सदस्यत्व रद्द करा!

**फौजदारी गुन्हा दाखल करून अपात्रतेची कारवाई करण्याची बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीची मागणी, आठ दिवसांत कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

नगर परिषद गडचिरोलीच्या नगरसेविका तथा महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती शिल्पा अंकित हेमके (शिल्पा उद्धवराव गव्हारे) यांच्या कथित अनधिकृत बांधकामप्रकरणी तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांचे नगरसेवकपद रद्द व अपात्रतेची कारवाई करावी, अशी मागणी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या गडचिरोली जिल्हा शाखेने आज पत्रकार परिषदेत केली.

पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा विदर्भ कमेटी सदस्य मिलिंद बांबोळे यांनी सांगितले की, जिल्हा सहआयुक्त (न.प. प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली यांनी २४ ऑगस्ट २०२६ रोजी मुख्याधिकारी,



नगर परिषद गडचिरोली यांना पत्र देऊन मौजा गडचिरोली येथील सर्वे क्रमांक ११/१-क, भूखंड क्रमांक ६६ वरील अनधिकृत बांधकामाची चौकशी करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

पक्षाच्या आरोपानुसार, सदर भूखंड नगर परिषदेकडे गहाण राखीव असतानाही तेथे बांधकाम करण्यात आले असून, बांधकामासाठी आवश्यक परवानगी अथवा मंजूर नकाशा उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला. या प्रकरणात नगरसेविका शिल्पा हेमके व त्यांचे पती अंकित हेमके यांच्या सहभागाबाबत चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली.

आठ दिवसांचा कालावधी उलटूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कारवाई झालेली नाही, असा आरोप पक्षाने केला. त्यामुळे तातडीने फौजदारी कारवाई करून नगरसेविकेचे सदस्यत्व रद्द व अपात्रतेची कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पक्षाने दिला. पत्रकार परिषदेला ॲड. संजय जनबंधू (जिल्हाध्यक्ष, वकील आघाडी), अरविंद वाळके (जिल्हा महासचिव), तसेच चंद्रप्रकाश गेडाम यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

पत्रकार परिषद नंतर गडचिरोली च्या नगरसेविका शिल्पा अंकित हेमके यांची प्रतिक्रिया घेतली असता, सदर भूखंड वर तात्पुरता बांधकाम असून येथे ले आउटचे काम सुरु आहे. त्याचे साहित्य ठेवण्यासाठी हे बांधकाम आहे. या बाबत नगर परिषद ने मला नोटीस दिली. त्याला गडचिरोली सेशन कोर्ट मध्ये आवाहन दिले आहे. कोर्ट जो निर्णय देईल. तो मला मान्य राहील. हा विरोधकांचा बिनबुडाचा आरोप आहे, असे हेमके यांनी आपल्या प्रतिक्रीयेत सांगितले.

## इनर व्हील क्लबतर्फे ६५ विद्यार्थिनींना ई-लर्निंग कार्डचे वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूर, डिस्ट्रिक्ट ३०३च्या अध्यक्षा पूजा साओजी यांच्या नेतृत्वाखाली धीरन कन्या शाळेतील इयत्ता १०वीच्या ६५ विद्यार्थिनींना प्रत्येकी १,५०० किमतीच्या ई-लर्निंग कार्डचे वाटप करण्यात आले. विद्यार्थिनींना अतिरिक्त डिजिटल शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या बोर्ड परीक्षेच्या तयारीला अधिक बळ देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. विशेषतः अतिरिक्त शिकवणीचा खर्च परवडत नसलेल्या विद्यार्थिनींसाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.

धीरन कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. प्रीती अग्रवाल यांनी इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्या या शैक्षणिक उपक्रमाचे कौतुक केले. ई-लर्निंग कार्ड मिळाल्याने विद्यार्थिनींनी आनंद व्यक्त केला आणि या सुविधेमुळे अभ्यासात तसेच परीक्षेच्या तयारीत निश्चितच मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. या प्रकल्पासाठी डॉ. विजया खांजोडे यांनी प्रायोजकत्व दिले असून क्लबच्या पाच सदस्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन सहकार्य केले.



# गडचिरोलीच्या मुख्य तलावात साकारावे स्वामी विवेकानंदांचे स्मारक

**उदय धकाते यांच्या संकल्पनेला आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांचा सकारात्मक प्रतिसाद, जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश**

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

गडचिरोली शहराच्या मध्यवर्ती भागातील मुख्य तलाव परिसराचे सुरू असलेले सौंदर्यीकरण आता अंतिम टप्प्यात आले आहे. या परिसरात स्वामी विवेकानंद यांचे भव्य पूणार्कृती स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी कारगिल स्मारक समितीचे संस्थापक अध्यक्ष उदय धकाते



यांनी आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्याकडे केली होती. या मागणीची तातडीने दखल घेत आमदार नरोटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

हिंदी महासागरातील स्वामी विवेकानंद स्मारकापासून प्रेरणा घेत गडचिरोलीच्या मुख्य तलावातही विवेकानंदांचे स्मारक उभारण्याची संकल्पना उदय धकाते यांनी मांडली आहे. हे स्मारक युवक, विद्यार्थी आणि नागरिकांसाठी प्रेरणास्थान ठरण्यासोबतच गडचिरोलीच्या पर्यटन व सौंदर्यात भर घालणारे नवे आकर्षण ठरू शकते.

गडचिरोलीचे आकर्षण ठरलेले कारगिल स्मारक उभारण्यासाठी उदय धकाते यांनीच पुढाकार घेतला असून, त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून हे स्मारक साकारले आहे. आता त्याच धर्तीवर शहराच्या मध्यवर्ती तलाव परिसरात स्वामी विवेकानंदांचे स्मारक उभारण्याचा प्रस्ताव त्यांनी पुढे आणला आहे.

स्मारकासोबत स्वामी विवेकानंदांचे प्रेरणादायी विचार, माहिती फलक, आकर्षक प्रकाशयोजना आणि परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे, अशी मागणीही धकाते यांनी केली आहे.

आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी उदय धकाते यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक प्रस्ताव शासनास सादर करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने, या प्रस्तावाला आता प्रशासकीय स्तरावर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शनिवार, १२ सप्टेंबर २०२६

# मोबाईलच्या वादातून ५५ वर्षीय राजू तांडेकर यांचा मृत्यू, चौघांवर खुनाचा गुन्हा

## डोरलीतील घटनेला नवे वळण, तिघांना अटक, विधी संघर्षग्रस्त बालक ताब्यात, मेयोच्या शवविच्छेदन अहवालाकडे लक्ष

**दै. सिंहवाणी वृत्त,. डोरली, पारशिवनी**

पारशिवनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डोरली येथे मोबाईलच्या कारणावरून झालेल्या वादानंतर राजू हुलासिंग तांडेकर (५५) यांचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. मृतकाचा मुलगा अजय तांडेकर याने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधितांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात आलोक गजभिये, विशाल वाघमारे आणि आदित्य देशपांडे यांना अटक करण्यात आली असून, एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. सुरुवातीला ताब्यात घेतलेल्या राहुल हुमणे याला चौकशीनंतर सोडून देण्यात आले.

**मध्यरात्री मोबाईलवरून वाद**

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी मध्यरात्री सुमारे १ ते १.३० वाजताच्या दरम्यान राजू तांडेकर आणि पृथ्वीराज डोंगरे (४५) हे पार्वताबाई भुरे यांच्या घराजवळ उभे होते. यावेळी त्यांचा आलोक गजभिये, विशाल वाघमारे, राहुल हुमणे आणि आदित्य देशपांडे यांच्यासह वाद झाला. त्यांच्यासोबत एक विधी संघर्षग्रस्त बालकही असल्याची माहिती आहे.

विशाल वाघमारे यांच्या मोबाईलवरून वादाला सुरुवात झाल्याचे सांगण्यात येते. वाद वाढत जाऊन त्याचे रूपांतर मारामारीत झाल्याचा आरोप आहे. यामध्ये राजू तांडेकर आणि पृथ्वीराज डोंगरे यांना मारहाण झाल्याची माहिती आहे. घटनास्थळी पार्वताबाई भुरे आणि संतोष लांजेवार उपस्थित असल्याचे सांगण्यात येते. मारहाणीनंतर संबंधित युवक तेथून निघून गेल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर जखमी पृथ्वीराज डोंगरे हे आपल्या घरी गेले.

**सकाळी रक्तबंबाळ अवस्थेत मृतदेह**

शुक्रवारी सकाळी सुमारे ६ वाजताच्या दरम्यान राजू तांडेकर हे घटनास्थळी रक्तबंबाळ अवस्थेत मृत आढळून आले. घटनेची माहिती मिळताच डोरली



गावात खळबळ उडाली आणि घटनास्थळी नागरिकांची गर्दी झाली. दरम्यान, जखमी पृथ्वीराज डोंगरे यांना डोरली प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. ग्रामस्थांनी त्यांच्याकडून घटनेची माहिती जाणून घेतली. त्यांच्या जबाबातून प्रकरणातील आणखी काही बाबी स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

**मृत्यूच्या कारणाबाबत वैद्यकीय तपासणी महत्त्वाची**

राजू तांडेकर यांच्या मृतदेहाची पारशिवनी येथे डॉक्टरांकडून प्राथमिक तपासणी करण्यात आली. मृत्यूचे नेमके कारण आणि तो मारहाणीशी संबंधित आहे का, याबाबत वैद्यकीय तपासणीत अधिक स्पष्टता आवश्यक असल्याचे समोर आले.

गावातील नागरिकांकडून मारहाणीचे आरोप होत असल्याने पोलिसांनी प्रकरण गांभीर्याने घेतले. ठाणेदार तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांनी मृतदेह पुढील उत्तरीय तपासणीसाठी मेयो रुग्णालय, नागपूर येथे पाठविला आहे. त्यामुळे मेयोचा शवविच्छेदन अहवाल तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

**अजयच्या तक्रारीवरून खुनाचा गुन्हा**

मृतकाचा मुलगा अजय तांडेकर याने पोलिसांत तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. चौकशीदरम्यान आलोक गजभिये, विशाल वाघमारे आणि आदित्य देशपांडे यांना अटक करण्यात आली, तर एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. राहुल हुमणे याला चौकशीनंतर पोलिसांनी सोडून दिले आहे. विधी संघर्षग्रस्त बालकाचे नाव कायदेशीर कारणास्तव प्रसिद्ध करण्यात येत नाही.

**अतिरिक्त एसपींची घटनास्थळी भेट**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिल मस्के यांनी डोरली येथे भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली. त्यांनी नागरिकांशी संवाद साधून घटनेची माहिती जाणून घेतली. तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांच्याकडून आतापर्यंतच्या तपासाची माहिती घेतली. गावातील परिस्थिती चिघळू नये यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेण्यात येत आहे.

**कचरा गाडी चालक म्हणून काम; कुटुंबावर दु:खाचा डोंगर**

राजू तांडेकर हे डोरली ग्रामपंचायतीत कचरा गाडी चालविण्याचे काम करीत होते. त्यांच्या पत्नीचे यापूर्वीच निधन झाले असून, त्यांच्या पश्चात दोन मुले आहेत. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. राजू यांच्या मृत्यूची माहिती मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी माणुसकीच्या भावनेतून पुढाकार घेत त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी स्थानिक पातळीवर वर्गणी जमा केली. सुमारे ७ हजार रुपये ग्रामस्थांनी जमा केल्याची माहिती आहे.

**मेयोच्या अहवालानंतर तपासाला दिशा**

राजू तांडेकर यांच्या मृत्यूचे नेमके कारण काय, मोबाईलच्या वादानंतर प्रत्यक्षात काय घडले, मारहाणीमध्ये कोणाचा सहभाग होता आणि मृत्यूशी त्याचा संबंध आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. मेयो रुग्णालयाचा शवविच्छेदन अहवाल, साक्षीदारांचे जबाब आणि इतर उपलब्ध पुरावे तपासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. या अहवालानंतर प्रकरणातील पुढील तपासाला अधिक स्पष्ट दिशा मिळण्याची शक्यता आहे. मोबाईलच्या किरकोळ कारणावरून सुरू झालेल्या वादाचा शेवट ५५ वर्षीय व्यक्तीच्या मृत्यूत झाल्याने डोरली परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्रकरणाचा पुढील तपास पारशिवनी पोलीस करीत आहेत.

## थोडक्यात

### निमखेडा येथील विश्रांती कॉन्व्हेंट स्कूलमध्ये पोळा उत्सव उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू -मौदा**

निमखेडा येथील विश्रांती कॉन्व्हेंट स्कूलमध्ये बैल-पोळा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी बैलांच्या पूजेचे महत्त्व सांगितले. त्यांनी शेतकरी आणि बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांनी बैलांचा पोशाख परिधान केला होता. प्राचार्य शांता खांडेकर, बिंदू तागिरिसा आणि रक्षक खांडेकर यांनी पोळा उत्सवाचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले.

### चाचेर येथे तान्हा पोळा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू -मौदा**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही चाचेर गावात ठिकठिकाणी तान्हा पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वार्ड क्रमांक १ मधील हनुमान मंदिर परिसरात हा उत्सव अतिशय आनंदी आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. या प्रसंगी लहान बालकांनी आपले सजवलेले लाकडी नंदी बैल घेऊन उत्सवात सहभाग घेतला. सर्व लहान बालकांना भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या, त्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर सुंदर हास्य फुलले व त्यांचा आनंद द्विगुणित झाला.

या कार्यक्रमाला ग्रामपंचायत चाचेर सरपंचा लुंबिनी महेश कलारे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्यगण योगेश निनावे, माजी उपसरपंच प्रकाश वाकलपुडी, नरेंद्र निनावे, मंगेश लेदे, गज्जू कैकाडे, कृष्णा साखरवाडे, रामा बागडे,प्रमोद कांबळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जीवन सहारे, राधेश्याम दरवई, रमेश निनावे, अशोक बावनकुळे, डॉ.दिनेश बादोले, विलास दरवई, राकेश राऊत, महेश वंजारी, नीलकंठ बावनकुळे,महेश महादुले, नरेंद्र लोहकरे,महेश सोनवणे,प्रकाश निनावे,पुरुषोत्तम गडे,राजू महादुले, शिशुपाल कुटे, प्रवीण निनावे, दिलीप ढोमणे, आकाश राऊत,नंदू बुधे, रवी खंडाईत,आकाश बावणे यांच्यासह लहान बालके, महिला भगिनी व पुरुष मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील परंपरा आणि संस्कृती जपत हा तान्हा पोळा उत्सव यशस्वीपणे पार पडला.

### येसंबा( सालवा) येथे तान्हा पोळा आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू -मौदा**

चाचेर- निमखेडा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या येसंबा (सालवा) येथे ग्रामपंचायत कार्यालय येसंबा प्रांगणात तान्हा पोळ्याचे आयोजन उपसरपंच धनराज हारोडे तसेच गावातील लोकांच्या सहभागातून करण्यात आले. बालगोपाल यांना भेटवस्तू आणी प्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपसरपंच धनराज हारोडे, पोलीस पाटील नरेंद्र राऊत,कार्तीक भोयर, सिध्दार्थ गजभिये, नागोराव पानतावणे, कुमार गडे, रविशंकर हारोडे, सुंदरलाल महाल्ले, फुलचंद इरपाते, महेन्द्र कारोंडे ,अतुल कारोंडे सह गावातील महिला व पुरुष मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### रेशीमबागेत तान्हा पोळा स्पर्धेला बाळगोपाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

युवारंग प्रतिष्ठान, गजानन चौक, रेशीमबाग येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही तान्हा पोळा उत्सव ४०० हुन अधिक बालगोपाळांच्या उत्तम वेशभूषा आणि बैल सजावट करून उत्साहात संपन्न झाला. ही स्पर्धा उत्कृष्ट बैल सजावट,वेशभूषा, उत्तम संदेश अशा विषयावर आधारित असून या स्पर्धेत सहभागी बाळगोपाळांसाठी एकूण २१ दमदार पुरस्कार देण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक सायकल, द्वितीय- वेडिओ गेम, तृतीय-स्टडी टेबल, चतुर्थ- एड्यूजेशन बोर्ड, पांचवा- कॅरम बोर्ड आणि ६ स्पर्धकांना प्रोत्साहन पुरस्कार व उत्तम वेशभूषेसाठी १० बाळगोपाळांना विशेष प्रोत्साहन कैश प्राइस देण्यात येईल. या स्पर्धेचे अध्यक्षस्थान नंदनवन भाग संघचालक अशोकजी बुजोने, तर प्रमुख पाहुणे म्हणून सक्करदरा पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक रमेशजी खुणे, डॉ.राजीवजी त्रिवेदी, एड रमणजी सेनाड, नगरसेवक चंद्रकांत खांगार, मानसी शिमले, हितेंद्र चव्हाण, शिमले, प्रदीप तुपकर, प्रशांत मानेकर, रौनक चौधरी,पदाधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेचे आयोजन युवारंगचे गौरव शहाकार, डॉ.श्रीरंग वराडपांडे, यांचे असुन स्पर्धेसाठी सारंग गादेवार, अमित निचकवडे, डॉ पराग दांडेकर, डॉ योगेश ईंगोले, धर्मेंद्र खमेले, प्रवीण गुल्हाने, सत्यंजय त्रिवेदी, स्नेह शेरेकर,रोहित त्रिवेदी, विनय शाहू, प्रतीक त्रिवेदी, विशाल शहाकार आदी पदाधिकार परिश्रम घेतले. युवारंग प्रतिष्ठान, लोकजागृती मोर्चा, महावीर युथ क्लब, श्री सद्गुरू सेवातीर्थ फाऊंडेशन, एकवीरा शारदोत्सव मंडळ, सनातन सांस्कृतिक क्रीडा परिषद यांचे पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले.

## चंद्रपुरात उद्या 'द मराठा चॅरिटेबल ट्रस्ट' व 'बाळूभाऊ मित्र परिवार'तर्फे भव्य दहीहंडी, वेशभूषा व महिलांसाठी रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे )**

द मराठा चॅरिटेबल ट्रस्ट आणि बाळूभाऊ मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या, शनिवार, १२ सप्टेंबर २०२६ रोजी चंद्रपूर शहरातील न्यू इंग्लिश शाळेचे मैदान, वरोरा नाका चौक येथे खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या विशेष उपस्थितीत "वेध मराठी मनाचा, उत्सव चंद्रपूरकरांचा" या संकल्पनेखाली भव्य सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवांतर्गत भव्य 'भाऊंची दहीहंडी', ५ ते १० वर्षे वयोगटातील बालगोपाळांसाठी 'वेशभूषा स्पर्धा' तसेच महिलांसाठी 'रस्सीखेच स्पर्धा' अशा विविध आकर्षक स्पर्धा रंगणार आहेत.




कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ३:०० वाजता महिलांच्या भव्य रस्सीखेच स्पर्धेने होईल, ज्यामध्ये १८ वर्षांवरील महिलांना सहभाग घेता येईल; या स्पर्धेतील विजेत्यांना अनुक्रमे ११,०००, ७,००० आणि ५,००० रोख पारितोषिक व आकर्षक चषक प्रदान करण्यात येणार आहे. यानंतर सायंकाळी ५:०० वाजता ५ ते १० वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी 'भारतातील थोर महापुरुष' या विषयावर आधारित वेशभूषा स्पर्धा पार पडेल, ज्यातील विजेत्यांना अनुक्रमे ५,०००, ३,००० आणि २,००० रोख पारितोषिक व चषक देऊन गौरविले जाईल.

या संपूर्ण उत्सवाचे मुख्य आकर्षण असलेली सर्वांसाठी खुली असलेली भव्य 'भाऊंची दहीहंडी' स्पर्धा सायंकाळी ७:०० वाजता सुरू होईल, ज्यामध्ये विजेत्या गोविंदा पथकास १,५१,००० रु. व आकर्षक चषक देऊन सन्मानित केले जाणार आहे. या सर्व स्पर्धांसाठी आयोजकांकडून विशिष्ट अटी व नियम लागू करण्यात आले असून, वेशभूषा स्पर्धेसाठी उद्या सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत तर रस्सीखेच स्पर्धेसाठी आधारकार्डसह नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

या भव्य सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवात चंद्रपूर शहर व परिसरातील नागरिकांनी, गोविंदा पथकांनी, महिलांनी आणि बालगोपाळांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन 'द मराठा चॅरिटेबल ट्रस्ट' व 'बाळूभाऊ मित्र परिवार' यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## एस. के. पोरवाल कॉलेजच्या मुलींची कबड्डीत बाजी, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड!



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

क्रीडा व युवक संचनालय पुणे अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा एस के पोरवाल कॉलेजच्या मैदानावर स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धेमध्ये विविध शाळेतील विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. यामध्ये एस के पोरवाल कॉलेजच्या विरुद्ध प्रगतिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कोराडी याचमुने पहिल्या हाफ मध्ये पोरवाल कॉलेजला एका लोन नी हरवून प्राकृतिक विद्यालय पुढे होती. हाफ ब्रेकनंतर पोरवाल कॉलेजच्या खेळाडूंनी परत वापसी करत देवी काटर पवार तसेच खुशी कडनाईके यांनी अतिशय सुंदर रेड टाकून आपल्या चमूला दहा गुणांनी विजय मिळवून दिला. यामध्ये कॉलेजच्या प्राध्यापिका डॉक्टर मल्लिका नागपुरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य टीमला मिळाले तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दहाट व उपप्राचार्य सर व पर्यवेक्षक मेंढे सर व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी चम्मचे पुढील जिल्हास्तरीय स्पर्धा करिता शुभेच्छा दिल्या.

## शासकीय तंत्रनिकेतन व दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स तर्फे राष्ट्रीय हातमाग दिवस




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्ताने नुकत्याच झालेल्या २ सप्टेंबर रोजी, शासकीय तंत्रनिकेतन (गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक), नागपूर आणि दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), नागपूर लोकल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय हातमाग दिन उत्साहात संपन्न झाला. आपल्या देशाच्या समृद्ध हातमाग वारसाचे जतन करणाऱ्या व कुशल विणकरांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हातमाग हा भारताच्या सांस्कृतिक ओळखीचा एक अविभाज्य भाग आहे, ज्याचा इतिहास ७,००० वर्षांपेक्षा जास्त आहे. ही प्राचीन कलाकुसर पिढ्यानपिढ्या जपत, प्रत्येक टप्प्यावर तिचे अन्य तंत्र, डिझाइन व आकृतिबंध विकसित झाले आहेत. याप्रसंगी शासकीय तंत्रनिकेतन नागपूरच्या कापड उत्पादक विभागातर्फे वृक्षारोपण कार्यक्रमासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला आशिष पी. मोडक (विभागीय संचालक, विदर्भ विभाग) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच नरेश उगेमुगे (वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी, माविम), डॉ. सी.पी.कापसे (विभागप्रमुख, कापड उत्पादन विभाग), डॉ.संदीप शिर्खेडकर (अध्यक्ष, दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर लोकल सेंटर), जयंत जोशी ( सचिव, दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर लोकल सेंटर) आणि डॉ. अविनाश वैद्य (संयोजक / उड्ब्ल्लपील्ली१, दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स) यांची प्रमुख उपस्थिती होती. आजच्या आधुनिक युगात 'एअर जेट स्पिनिंग सिस्टीम' सारख्या हाय- स्पीड तंत्रज्ञानामुळे दिवसाला ३०० मीटर कापड उत्पादन होत असतानाही, दिवसाला केवळ ६ मीटर उत्पादन देणाऱ्या पारंपरिक हातमागाचे मोल आजही तितकेच अनिवार्य आहे.

## विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण : सायबर सुरक्षा व महिला संरक्षणाबाबत जनजागृती



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**

मोहसीनभाई जव्हेरी कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बल्लारपूर येथे चंद्रपूर पोलीस विभाग तर्फे तीन दिवसीय स्वसंरक्षण प्रशिक्षण व विद्यार्थी सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या असमा खान होत्या. प्रमुख अतिथी म्हणून भरोसा सेलच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रज्ञा वाडेकर, पोलीस हवालदार बळीराम पवार, महिला पोलीस अंमलदार दिव्या कालिये, विना गेडाम तसेच चंद्रपूरचे दामिनी पथक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे दीपप्रज्वलन व माल्यार्पण करण्यात आले.

यावेळी प्रज्ञा वाडेकर यांनी विद्यार्थिनींना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श, महिला सुरक्षेसह समाजात घडणाऱ्या विविध घटनांची उदाहरणे देत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. प्राचार्या असमा खान यांनी प्रशिक्षणातून मिळालेले धडे विद्यार्थिनींनी दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष उपयोगात आणावेत, असे आवाहन केले.

जनजागृती रथातील प्रोजेक्टरच्या माध्यमातून सायबर सुरक्षा, व्यसनमुक्ती आणि महिला संरक्षण याबाबत माहितीपूर्ण व्हिडिओ दाखवून विद्यार्थिनींमध्ये सुरक्षा विषयक जनजागृती करण्यात आली. दरम्यान, पोलीस हवालदार प्रवीण रामटेके, पोलीस अंमलदार अभिषेक आडे, मार्शल आर्ट प्रशिक्षक वाजिद अली यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांचे प्रशिक्षण देण्यात आले. मार्शल आर्टचे विद्यार्थी साक्षी रणवीर, आर्यन रायपुरे व हसरत अली यांनीही विविध प्रात्यक्षिके सादर केली. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींना प्रमुख अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थी व शिक्षकांना सुरक्षा मंत्र या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. सहायक पोलीस निरीक्षक प्रज्ञा वाडेकर, दिव्या कालिये व विना गेडाम यांच्या उपस्थितीत शाळेतील तक्रार पेटीचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका नझमी यांनी केले, तर शिक्षिका शबाना पठाण यांनी आभार मानले. यावेळी शाळेच्या प्राचार्या, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासोबतच त्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणारा हा तीन दिवसीय उपक्रम ठरला.